टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याने दुखापतीनंतर वर्षभराने दणक्यात कमबॅक करत आगामी बॉर्डर गावसकर ट्रॉफीसाठी दावा ठोकला आहे. शमीने रणजी ट्रॉफी स्पर्धेत बंगालकडून मध्यप्रदेशविरुद्धच्या सामन्यातून कमबॅक केले. शमीने या पहिल्याच डावात धमाका उडवून दिला. शमीने १९ ओव्हरमध्ये ५४ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. शमीच्या या भेदक गोलंदाजीमुळे बंगालला पहिल्या डावात आघाडी घेता आली. बंगालने पहिल्या डावात २२८ धावा केल्या. मात्र बंगालच्या गोलंदाजांनी मध्यप्रदेशला १६७ धावांवर गुंडाळले. त्यामुळे बंगालला ६१ धावांची आघाडी मिळाली. शमीला सामन्यातील पहिल्या दिवशी मध्यप्रदेशविरुद्ध एकही विकेट मिळाली नाही. शमीने पहिल्या दिवशी १० ओव्हरमध्ये ३४ धावा दिल्या. मात्र शमी दुसऱ्या दिवशी यशस्वी ठरला आणि विकेट्स मिळवल्या.

## ६ वर्षांनी भारताकडून पराभवाची परतफेड

■ सेंच्युरियन



तिलक वर्मा याच्या शतकी खेळीच्या जोरावर भारताने दक्षिण आफ्रिकेवर सेंच्युरियनमध्ये दक्षिण आफ्रिकेवर ११ धावांनी विजय मिळवला. भारताने या विजयासह ४ सामन्यांच्या मालिकेत २-१ ने आघाडी घेतली. तिलक वर्मा याच्या १०७ धावांच्या मदतीने भारताने ६ विकेट्स गमावून २० ओव्हरमध्ये २१९ धावा केल्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेने जोरदार प्रतिकार करत सामना शेवटच्या ओव्हरपर्यंत खेचला. मात्र त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. दक्षिण आफ्रिकेला ७ विकेट्स गमावून २०८ धावाच करता आल्या. भारताने यासह सेंच्युरियन येथील स्पोर्ट्सपार्क ग्राऊंडमध्ये विजय मिळवला आणि दक्षिण आफ्रिकेचा हिशेब चुकता केला उभय संघातील सेंच्युरियन येथील हा दुसरा टी-२० सामना होता. याआधी दोन्ही संघात २१ फेब्रुवारी २०१८ रोजी टी-२० सामना खेळवण्यात आला होता.

## १९ वर्षांखालील आशिया कपसाठी भारतीय संघ जाहीर

■ नवी दिल्ली

बीसीसीआयने आगामी अंडर १९ आशिया कप २०२४ स्पर्धेसाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. बीसीसीआयने एकूण १५ खेळाडूंची निवड केली आहे. तर ५ राखीव खेळाडूंचा समावेश केला आहे. मोहम्मद अमन याच्याकडे कर्णधारपदाची धुरा देण्यात असणार आहे. तर किरण चोरमले उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मुंबईकडून रणजी ट्रॉफीत द्विशतक करणाऱ्या वसईकर आयुष म्हात्रे याचाही या स्पर्धेसाठी भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. तर हार्दिक राज यालाही संधी मिळाली आहे. या स्पर्धेत एकूण ८ संघ सहभागी होणार आहेत. या ८ संघांना ४-४ नुसार ए आणि बी ग्रुपमध्ये विभागण्यात आले आहे. ए ग्रुपमध्ये टीम इंडिया, पाकिस्तान, जपान आणि यजमान यूएई आहे. तर बी ग्रुपमध्ये अफगाणिस्तान, बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंकेचा समावेश आहे.

### भारतीय संघ

मोहम्मद अमन (कॅप्टन), किरण चोरमले (उपकर्णधार), आयुष म्हात्रे, वैभव सूर्यवंशी, सी आंद्रे सिद्धार्थ, प्रणव पंत, हरवंशसिंग पनगालिया (विकेटकीपर), अनुराग कवडे (विकेटकीपर), हार्दिक राज, एमडी ईनान, केपी कार्तिकेय, समर्थ नागराज, युधाजित गुहा, चेतन शर्मा आणि निखिल कुमार.

## प्रो कबड्डी लीग! ७ पराभवानंतर गुजरातचा बंगाल वॉरियर्सवर विजय

■ नोएडा

प्रो कबड्डी लीगच्या ११ व्या हंगामात गुजरात टायटन्सची कामगिरी अत्यंत खराब झाली . अखेर ७ पराभवानंतर गुजरातला विजयाची चव चाखायला मिळाली . गुजरातने बंगाल वॉरीयर्सवर १९ गुणांनी विजय मिळवला .

गुजरात विरुद्ध बंगाल यांच्यातील सामना काहीसा एकतर्फी झाला गुजरात टायटन्सच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करीत हाफटाइममध्ये २ वेळा ऑलआउट केले. हाफटाईमला गुजरात २४-१३ अशा फरकाने आघाडीवर होती. गुमनसिंगने १७ गुण मिळवले याउलट बंगालचा कर्णधार फजल अत्राचाली आणि मनिंदर सिंह पूर्णपणे फ्लॉप ठरले. नितीनने रेडिंग मध्ये थोडीफार चपळता दाखवली.



पण तेवढी पुरेशी नव्हती. कारण गुजरातचे खेळाडू अत्यंत आक्रमकपणे खेळत होते. आणि त्यांची आक्रमकता अखेरपर्यंत कायम राहिली त्यामुळेच बंगालचा पराभव झाला.

## एलआयसी-आयडियल बुद्धिबळ स्पर्धेत आराध्या पुरो दोन गटात विजेती

■ मुंबई

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी-ग्रुपतर्फे बालदिनानिमित्त लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत एलआयसी-आयडियल कप शतक महोत्सवी बुध्दिबळ स्पर्धेमध्ये अपराजित ९ वर्षीय आराध्या पुरो हिने ९ व १० वर्षाखालील दोन्ही वयोगटात सर्वाधिक ४.५ गुण मिळवुन विजेतेपदाचा डबल धमाका केला. १० वर्षाखालील गटात निर्णायक पाचव्या साखळी फेरीमध्ये आराध्या पुरोने अर्जुन बॅनर्जीच्या राजाला २८ व्या मिनिटाला शह देत दुसऱ्या विजेतेपदाला गवसणी घातली. मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटना, आरएमएमएस व को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन-मुंबई सहकार्याने झालेल्या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ सिंधुदुर्ग सहकारी बँकेचे चेअरमन हरीश परब, मुंबई शहर बुध्दिबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी,चंद्रकांत कनगुटकर, लीलाधर चव्हाण यांच्या हस्ते पार पडला.

## राष्ट्रीय ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा - २०२४
## सुर्या थात्तु, पूजा दानोले महाराष्ट्र संघाचे कर्णधार



■ मुंबई


चेन्नई, तामिळनाडू येथे १५ ते १९ नोव्हेंबर २०२४ दरम्यान ७६वी सीनिअर, ५८ज्युनिअर आणि ३९वी सब ज्युनीअर राष्ट्रीय ट्रॅक सायकलिंग अजिक्यपद स्पर्धा होत आहेत. या स्पर्धेत सहभागी होणा-या महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी पुरुषांमध्ये आंतरराष्ट्रीय सायकलपटू सुर्या थात्तु आणि महिलांमध्ये आंतरराष्ट्रीय पदक विजेती सायकलपटू पूजा दानोले यांची निवड करण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय पंच आणि प्रशिक्षक सुदाम रोकडे यांच्या अध्यक्षतेखालील प्रताप जाधव, प्रा. संजय साठे, श्रीमती दिपाली पाटील, मिलींद झोडगे आणि उत्तम नाळे यांच्या समितीने महाराष्ट्राचा २१ पुरुष आणि २० महिला असा एकूण ४१ सायकलपट्टूंचा संघ जाहीर केला. मुख्य प्रशिक्षक म्हणून महाराष्ट्र शासनाच्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्रीमती दिपाली पाटील यांची नेमणूक करण्यात आली आहे.

**महाराष्ट्राचा संघ पुढीलप्रमाणे :**

पुरुष : सूर्या थात्तू (कर्णधार), मंगेश ताकमोगे, वेदांत जाधव (तिघे पुणे), मंथन लाटे (ठाणे), वेदांत ताजने (नाशिक), विवान सप्रू (मुंबई) मेन ज्युनिअर : साहिल शेटे, हरिष दिपक डोंबाळे समरजित हरी थोरबोले (दोघे क्रीडा प्रबोधिनी पुणे), सोहम पवार (दोघे पुणे), सक्षांत मोठे (सांगली) बॉईज सब ज्युनिअर : सिद्धेश सर्जेराव घोरपडे ,ओंकार जोतिराम गांधले, प्रणय भागाण्णा चिनगुंडे , श्रीनिवासअनंता जाधव, अशिष संजय पवार, (सर्व क्रीडा प्रबोधिनी पुणे), शंभूराजे यादव (धाराशिव) युथ बॉईज : संस्कार घोरपडे, अर्णव गौंड, अनुज गौंड, अर्णव गुडाळकर (सर्व पुणे) महिला : पूजा दानोले (कर्णधार - कोल्हापूर), श्वेता गुंजाळ, अदिती प्रमोद डोंगरे (क्रीडा प्रबोधिनी पुणे) संस्कृती खेसे ( दोघी पुणे), शिया ललवाणी (नाशिक).

**भारतातील भौतिकशास्त्राच्या उद्गात्या, ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. रोहिणी गोडबोले यांचा जन्म १२ नोव्हेंबर १९५२ रोजी झाला. भौतिकशास्त्रात जागतिक पातळीवर ठसा उमटवणाऱ्या आघाडीच्या भारतीय शास्त्रज्ञांमध्ये पुण्याच्या या लेकीचा समावेश होता. मूळच्या पुण्याच्या असलेल्या प्रा. डॉ. रोहिणी गोडबोले विज्ञान आणि गणित क्षेत्रातील त्यांच्या बहुमूल्य योगदानासाठी ओळखल्या जात. त्यांचे प्रार्थमिक शिक्षण पुण्यातील हुजूरपागा या विद्यालयातून झाले.**



# भारतातील भौतिकशास्त्राच्या उद्गात्या, ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. रोहिणी गोडबोले

**शिक्षण** क्षेत्रात उंच भरारी घेण्यासाठी आणि भौतिकशास्त्र, गणित आणि सांख्यिकी विषयात पदवीधर त्या पुण्यातील परशुरामभाऊ महाविद्यालयातून झाल्या. सावित्रीबाई पुणे विद्यापीठातून पदवी मिळवत त्यांनी IIT मुंबईमध्ये प्रवेश घेतला. विशेष म्हणजे त्यांनी न्यूयॉर्कच्या स्टोनि ब्रोक युनिव्हर्सिटीत पुढील शिक्षण घेतले. प्रा. डॉ. रोहिणी गोडबोले यांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानातील बहुमूल्य योगदानासाठी त्यांचा २००९ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरव केला गेला. इतकेच नव्हे तर त्यांना 'नॅशनल अवॉर्ड ऑफ मेरिट' या पुरस्काराने गौरविण्यातही आले. फ्रान्स सरकारने त्यांचा गौरव केला होता. असे अनेक पुरस्कार त्यांच्या नावे आहेत. मूलभूत कारणांसाठी 'स्टँडर्ड मॉडेल' वापरले जात होते. पण, यावर प्रा. डॉ. रोहिणी गोडबोले यांनी दाखवून दिले की, यासाठी फक्त 'स्टँडर्ड मॉडेल' पुरेसे नाही आहे. त्यांचे म्हणणे होते की, अँटीमीटरच्या अस्तित्वासाठी तसेच त्याविषयी आणखीन जाणून घेण्यासाठी नव्या विज्ञानाचा विचार करावा लागणार.



FILE PHOTO

प्रा. डॉ. रोहिणी गोडबोले या इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेसच्या अध्यक्षा होत्या. त्यांनी येथे महिलांसाठी अध्यक्षपद भूषवले होते. शेवटच्या काळात त्या IISC बंगलोरमध्ये संशोधनाचे कार्य बजावत होत्या. भारत सरकारने डॉ. रोहिणी गोडबोले यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानातील योगदानासाठी २०१९ साली पद्मश्री हा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला होता. इतकेच नाही तर फ्रेंच सरकारकडूनही त्यांना जीवीश Ordre National du Mérite हा फ्रान्समधील प्रतिष्ठित पुरस्कार देण्यात आला होता. Phd केल्यानंतर ३ वर्षे गोडबोले यांनी मुंबईत TIFR मध्ये काम केले होते तर त्यानंतर चार महिने मुंबईला रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये आणि तब्बल १२ वर्षे मुंबई विद्यापीठात सुरुवातीला व्याख्याती आणि नंतर अधिव्याख्याती म्हणून काम केले असल्याचा रेकॉर्ड त्यांच्या नावावर आहे. २०१९ या सालामध्ये प्रा. डॉ. रोहिणी गोडबोले




या इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, बेंगळूरू येथे काम करत होत्या आणि त्यांनी कण भौतिकी, उच्च ऊर्जा भौतिकी आणि कोलायडर भौतिकी या विषयांत चाळीसहून अधिक वर्षे संशोधक प्राध्यापक म्हणून काम केले आहे. रोहिणी गोडबोले यांचे २५ ऑक्टोबर २०२४ रोजी निधन झाले.

# प्रयागराजमधील विद्यार्थी आंदोलनाला यश युपीएससीचे नमते! परीक्षा एकाच दिवशी

■ प्रयागराज

**उत्तर** प्रदेशच्या प्रयागराजमध्ये आंदोलनकर्त्या उत्तर प्रदेश लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) विद्यार्थ्यांसमोर अखेर आज प्रशासनाने नमते घेतले. प्रादेशिक अधिकारी (आरओ) आणि सहाय्यक प्रादेशिक अधिकारी (एआरओ) पदाच्या परीक्षा एकाच दिवशी एकाच वेळी घेण्याची विद्यार्थ्यांची मागणी आयोगाने मान्य केली.



आरओ आणि एआरओपदाच्या परीक्षा दोन दिवसांत घेण्याचे नियोजन युपीपीएससीने केले होते. त्याला विरोध करीत विद्यार्थ्यांनी सोमवारपासून शांततापूर्ण आयोगाच्या कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन सुरू केले होते. गेले तीन दिवस शांततापूर्ण आंदोलन करूनही आयोग दखल घेत नसल्याने आज चौथ्या दिवशी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास विद्यार्थी आक्रमक झाले. विद्यार्थ्यांचा एक गट बॅरिकेड तोडून आयोगाच्या कार्यावर चाल करून जाण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आयोगाच्या कार्यालयाच्या आवारात काही वेळ तणाव निर्माण झाला होता.

# भाजपाच्या बालेकिल्ल्यात शरद पवार यांचा रोड शो

■ पुणे

**पुण्यातील** भाजपाचा बालेकिल्ला असलेल्या चिंचवड विधानसभा मतदारसंघात शरद पवार यांनी आज पहिल्यांदाच रोड-शो केला. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांच्या प्राचारार्थ पवार यांनी हा रोड-शो केला. या रोड-शोला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर एकेकाळी बालेकिल्ला असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराकडे दोन्ही गटांनी विशेष लक्ष दिले आहे. शरद पवार आणि अजित पवार या दोघांचेही शहरात सातत्याने दौरे होत आहेत. शरद पवार यांनी शहरातील पिंपरी-चिंचवड आणि भोसरी तिन्ही मतदारसंघ आपल्या पक्षाकडे घेतले आहेत.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत बिबट्याचा जागीच मृत्यू

■ निफाड

**कोटमगाव-** पिंपळगाव बसवंत रस्त्यावर रात्री अज्ञात वाहनाच्या धडकेत मादी बिबट्याचा जागीच मृत्यू झाला. कोटमगावपासून एक किलोमीटर अंतरावर रात्री मादी बिबट्या रस्ता ओलांडत होता. त्याचवेळी वाहनाने या बिबट्याला धडक दिली. या बिबट्याच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना समजताच लासलगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वनविभागाला याबाबत माहिती दिली. काही वेळातच वनविभागाचे मनमाडचे वनपरिक्षेत्राधिकारी आखाडे, वनपाल भगवान जाधव आणि वनरक्षक विजय दोडे यांनी मृत बिबट्याला शासकीय गाडीने निफाड येथे आणले.

# केवळ आदिवासी म्हणून झिरवाळांना ठोकू नका

■ दिंडोरी

**वाणी** येथे अजित पवार पक्षाचे उमेदवार नरहरी झिरवाळ यांच्या प्रचारासाठी आज दुपारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जाहीर सभा झाली. झिरवाळ यांच्यावर टीका करणारे शरद पवार यांचे नाव न घेता या सभेत अजित पवार म्हणाले की, फक्त आदिवासी म्हणून झिरवाळांना ठोकू नका. झिरवाळ दिल्लीत वगैरे कुठेही गेलेले नव्हते. त्यांनी कोणताही वेगळा निर्णय घेतला नाही. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वच्या सर्व ५२ आमदारांनी एकत्रितपणे महायुतीसोबत जाण्याचा निर्णय घेतलेला होता. यामध्ये सध्या शरद पवार यांच्या सोबत असलेले जयंत पाटील आणि राजेश टोपे यांचाही समावेश होता.

## अजित पवारांचे वक्तव्य

अजित पवार पुढे म्हणाले की, आम्ही महायुती बरोबर जाण्याचा निर्णय घेतला याचा अर्थ विचारधारा सोडली असा होत नाही. आम्ही आजही फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेला बांधिल राहून काम करीत आहोत. २०१४ मध्ये पक्षाने भाजपाला पाठिंबा दिलाच होता. २०१९ मध्ये शिवसेना आणि काँग्रेसला पक्षाने पाठिंबा दिला होता. त्यांची विचारसरणी पूर्णतः वेगळी होती. मग आता भाजपला पाठिंबा दिल्याने काय बिघडले? दिंडोरी मतदारसंघात तीन हजार कोटींचा निधी आला. दिंडोरीच्या इतिहासात एवढा निधी कधीही आलेला नसावा. जर सामान्य जनतेचा विकास होत असेल तर, आम्हाला दोष का दिला जातो?

# १,५०० दिलेत, मत न दिल्यास ३,००० वसूल करू!

■ कोल्हापूर

**कोल्हापूर** भाजपाच्या महिला उपाध्यक्ष मेघारानी जाधव यांनी लाडकी बहीणबाबत वादग्रस्त वक्तव्य केले आहे. त्या म्हणाल्या की, १५०० दिलेत, महायुतीला मत दिले नाही तर ३,००० वसूल करू. त्यांच्या या वक्तव्यावरून राजकीय वातावरण तापले आहे.

काही दिवसांपूर्वी भाजप खासदार धनंजय महाडिक यांनीदेखील लाडकी



भाजपा पदाधिकाऱ्याचे वक्तव्य

बहीणबाबत वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यानंतर आता पुन्हा भाजपाच्या महिला उपाध्यक्ष मेघारानी जाधव यांनी वादग्रस्त वक्तव्य केले आहे. करवीर पन्हाळा गगनबावडा विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार चंद्रदीप नरके यांच्या प्रचारार्थ गारीवाडे इथे आयोजित करण्यात आलेल्या सभेत भाजपाच्या महिला पदाधिकारी मेघारानी जाधव म्हणाल्या की, १,५०० दिलेत, महायुतीला मत दिले नाही तर ३,००० वसूल करणार. या वक्तव्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. यावर मोठ्या प्रमाणात टीकादेखील होत आहे.


## जाहिर नोटीस

मे. नॅशनल हिंदु हॉटेल, एफएल-३ क्र. २२०, एन. ए. स्वंत मार्ग, फायर ब्रिगेड जवळ, कुलाबा, मुंबई ४००००५ या अनुज्ञप्तीमधून दिवंगत अनुज्ञप्तीधारक श्रीमती लिलावती एम. शेट्टी यांचे नाव वगळून सदर अनुज्ञप्ती त्यांचा वारस मुलगा श्री. शशिकांत महाबल शेट्टी यांचे नावे समाविष्ट करावयाची असल्याने, सदर प्रकरणावर त्यांच्या कुटुंबातील / कंपनीतील संचालक यांचा कोणचा आक्षेप असल्यास त्यांनी ही जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यापासून (१५) दिवसांचे आत मा. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर, जुने जकात घर, दुसरा मजला, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई- २३ यांच्याशी संपर्क साधावा.

प्रस्तुत प्रकरणी जर वरील मुदतीत याबाबत कोणाचा लेरवी आक्षेप आला नाही तर सदर अनुज्ञप्ती श्री. शशिकांत महाबल शेट्टी यांच्या नावे वर्ग/समाविष्ट करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर नोटीस वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्याची प्रत पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयात सादर करण्यात यावी.

**सही/-**
**(डॉ. निलेश सांगडे)**
**जिल्हाधिकारी, मुंबई शहर करीता**


# 'कोल्डप्ले'चा चौथा शो अहमदाबादमध्ये होणार

■ अहमदाबाद

**भारतात** कोल्डप्लेच्या म्युझिक ऑफ द स्फिअर्स वर्ल्ड टूरच्या तिकिटांच्या काळाबाजाराचे प्रकरण ताजे असतानाच कोल्डप्ले बँडने भारतातील चौथ्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर २५ जानेवारी २०२५ रोजी हा कार्यक्रम होणार आहे. या कॉन्सर्टची तिकिटे १६ नोव्हेंबरपासून दुपारी १२ वाजता बुक माय शोवर उपलब्ध होतील. याबाबत कोल्डप्ले बँडने अधिकृत एक्स अकाऊंटवर माहिती पोस्ट केली आहे. प्रसिद्ध गायक ख्रिस मार्टिन, गिटारवादक जॉनी बकलँड, बासरीवादक गाय बेरीमन आणि ड्रमर विल चॅम्पियन या शोमध्ये सादरीकरण करणार आहे.

कोल्डप्लेने गेल्या महिन्यात १८ आणि १९ जानेवारी २०२५ रोजी मुंबईतील डी.



वाय. पाटील स्पोर्ट्स स्टेडियमवर दोन कार्यक्रम करण्याची घोषणा केली होती. या कार्यक्रमांच्या तिकिटांची ऑनलाईन विक्री सुरू झाल्यानंतर काही मिनिटांत सर्व तिकिटे विकली गेली होती. त्यानंतर या तिकिटांमध्ये मोठ्या प्रमाणात काळाबाजार झाल्याचा आरोप होऊन झाला होता. त्यानंतर यामुळे 'बुक माय शो' या संकेतस्थळाच्या मूळ कंपनी विरोधात पोलिसांनी समन्स बजावले होते. त्याची चौकशीही सुरू झाली. कोल्डप्लेच्या कॉन्सर्टच्या तिकिटांची मूळ किंमत २,५०० ते ३५,००० दरम्यान होती. पण या तिकिटासाठी चाहत्यांनी तब्बल ३ लाखांपर्यंतची रक्कम मोजली. तर तिकीट न मिळाल्याने अनेक चाहते नाराज झाले होते. त्यामुळे लोकांची मागणी लक्षात घेऊन २१ जानेवारीला मुंबईतच तिसरा शो करण्याची घोषणा केली. त्यानंतर चौथा शो अहमदाबादमध्ये होणार आहे. कोल्डप्लेने मुंबईत २०१६ मध्ये शो सादर केला होता.

# अमरावतीच्या मेळघाटातील ६ गावांचा मतदानावर बहिष्कार

**अमरावती** - मूलभूत सुविधा मिळत नसल्यामुळे मेळघाटातील ६ गावांना विधानसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकला आहे. जोपर्यंत आरोग्यासह अन्य मूलभूत सुविधा मिळत नाही, तोपर्यंत आम्ही मतदान करणार असल्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे. खामदा, किन्हीखेडा, धोकरा, कुंड आणि खोकमार या गावांनी मतदानावर बहिष्कार टाकण्याची भूमिका घेतली असून, या गावांत १,३०० मतदार आहेत.


## जाहीर सूचना

आमचे अशील श्री. सुनिल गगनदास जेथा आणि सौ. लता सुनिल जेथा, दोघेही ठाणे येथील निवासी, राहणार - सदनिका क्र. ९१/९२, ओर्नेल्ला बिल्डींग क्र. ७, कोर्टयार्ड, पोखरण रस्ता क्र. २, बेथानी रूग्णालयासमोर, पवार नगर, ठाणे - ४००६१० यांच्या वतीने याद्वारे सूचना देण्यात येते की, श्रीमती रोशनी ज्यांचे आमच्या अशिलांसह जुने संबंध होते आणि आमच्या अशिलांच्या समता नगर, ठाणे येथे स्थित व्यवसाय आस्थापनेमध्ये काम करीत होत्या आणि आमच्या अशिलांच्या व्यवसाय आस्थापनेमध्ये त्या दि. ११ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत कार्यरत होत्या. त्यानंतर, आमच्या अशिलांचे सदर श्रीमती रोशनी यांच्यासह प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही स्वरुपाचा संपर्क नाही.

तमाम जनता, विशेषतः, अशील, ग्राहक, पुरवठादार, धनको, इ. समाविष्ट असलेले परंतु त्यास मर्यादीत नसलेले विद्यमान, संभाव्य आणि इच्छुक व्यवसाय संबंध आणि हिस्सेदार यांना याद्वारे खबरदार करण्यात येते की, आमच्या अशिलांच्या पूर्वीच्या सहयोगी सदर श्रीमती रोशनी यांच्या जागेवर कोणताही व्यावसायिक व्यवहार किंवा इतर संबंध निर्माण करू नयेत. तर कोणी व्यक्ती तसे करीत असल्यास, त्याने/तिने तसे त्याच्या/तिच्या स्वतःच्या जोखमीवर करावे आणि आमचे अशील त्याकरिता कोणत्याही प्रकारे जबाबदार नसतील.

ठिकाणः मुंबई दिनांकः १५.११.२०२४

**सत्यप्रकाश शर्मा**
ॲडव्होकेट उच्च न्यायालय
#३०, २ रा मजला, नवाब इमारत,
३२७, डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई-४००००१.



GWELD SEAL OF TRUST

## जीईई लिमिटेड

सीआयएन: L99999MH1960PLC011879
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. ई-१, रस्ता क्र. ७, वागळे औद्योगिक वसाहत, ठाणे-४००६०४
ईमेल: Shares@geelimited.com वेबसाईट: www.geelimited.com
दूरध्वनी: (०२५२२) २८०३५८, फॅक्स: (०२५२२) २८११९९

**दि. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचा सारांश**

₹ लाखात (प्रती भाग उत्पन्न वगळता)

| अ. क्र. | तपशील | ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता | ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या चालू कालावधीकरिता अद्ययावत वर्षाचे आकडे | ३० सप्टेंबर, २०२३ रोजी संपलेल्या गत वर्षाकरिता सुसंगत ३ महिने |
|---|---|---|---|---|
| | | (अलेखापरिक्षित) | (अलेखापरिक्षित) | (अलेखापरिक्षित) |
| १ | कार्यातून एकूण उत्पन्न | ८,३०७.६९ | १९,२८३.०२ | ९,७६२.१३ |
| २ | कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबीं#पूर्व) | २५५.३९ | १,११९.१९ | ७२२.०६ |
| ३ | कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबीं#पश्चात) | २५५.३९ | १,११९.१९ | ७२२.०६ |
| ४ | कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबीं#पश्चात) | १९१.११ | ८३७.४९ | ५४०.३२ |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/(तोटा) (कर पश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) समाविष्ट) | १९१.१० | ८३७.८३ | ५४०.४८ |
| ६ | सम भाग भांडवल | ५२० | ५२० | ५२० |
| ७ | राखीव (पुनर्मूल्यांकित राखीव वगळता) गत वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार | लागू नाही | | |
| ८ | प्रति भाग उत्पन्न (दर्शनी किंमत ₹ २/- प्रत्येकी) (चालू आणि बंद कार्याकरिता) | | | |
| | मूळः | ०.७४ | ३.२२ | २.०८ |
| | सौम्यीकृतः | ०.७४ | ३.२२ | २.०८ |

टिपा:
१. सदर वित्तीय निष्कर्ष कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ सहवाचिता त्याअंतर्गत पारित संबंधित नियम अन्वये विहीत आयएनडी एएस ३४ अंतरिम वित्तीय अहवालामध्ये नमूद मान्यता आणि मापन तत्त्वांनुसार तयार करण्यात आले आहेत.
२. दि. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिताचे निष्कर्ष कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे सूचित भारतीय लेखा मानके (आयएनडी-एएस) च्या अनुपालनात आहेत.
३. आयएनडी एएस १०८ नुसार, कंपनीचा एकमेव अहवालयोग्य विभाग म्हणजेच "वेल्डींग कन्स्यूमेबल्स, तांब्याचे लेपन असलेल्या वायर्स, फ्लक्स कोअर्ड वायर्स आणि वेल्डींग फ्लक्सेसचे उत्पादन" आहे.
४. गत वर्षीचे /कालावधीचे आकडे आवश्यक तेव्हा पुनर्गठित किंवा पुनःवर्गिकृत केले आहेत.
५. निष्कर्ष पाहणीकरिता कंपनीची वेबसाईट **www.geelimited.com** आणि बीएसई लिमिटेडची वेबसाईट येथे अपलोड आणि उपलब्ध असतील.

**जीईई लिमिटेड** करिता
सही/-
**शंकर लाल अगरवाल**
पूर्ण-वेळ संचालक आणि सीएफओ
डीआयएन: ०१२०५३७७

**दिनांक**: १४.११.२०२४
**ठिकाण**: ठाणे

**रामेश्वर मिडिया**



**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

*(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)*

Name of Political Party : **Nationalist Congress Party (NCP)**

Name of Election : **Maharashtra Legislative Assembly 2024**

Name of state/UT : **Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of candidate | Name of Constit-uency | Pending criminal cases | | Details about cases of conviction for criminal offences | |
| | | | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed |
| 1 | Daulat Bhika Daroda | 135-Shahapur (ST) | Shahapur Civil. And Criminal Court Gunha GR No 109/98 CCN 97/98 | IPC Section- 147,148,149,452,323,427 | Not applicable | Not applicable |
| 2 | | | Shahapur Civil. And Criminal Court Gunha GR No 279/2010 | IPC Section- 341,143 | Not applicable | Not applicable |
| 3 | | | Bhiwandi Civil. And Criminal Court Gunha GR No. 111/2011 R.C.C./1200 212/2014 | IPC Section- 143, 147, 148, 341, 427, 323, 504, 506 sub section 149 | Not applicable | Not applicable |
| 4 | | | Shahapur Civil. And Criminal Court Gunha GR No 235/2014 | IPC Section- 143, 147, 149, 341, 188 | Not applicable | Not applicable |

देश विदेश

# दिल्लीत दाट धुक्याची चादर सात विमाने अन्यत्र वळवली

**रस्ते वाहतुकीवरही परिणाम**

■ नवी दिल्ली

**राजधानी** दिल्ली आणि आसपासच्या भागावर आज दाट धुक्याची चादर पसरली होती. त्यामुळे तापमानाचा पाराही घसरला. दिल्लीत आधीच धुक्याचे प्रदूषण असताना या हंगामातील पहिल्या दाट धुक्यामुळे दृष्यमानता अधिक घटली. त्याचा दिल्ली तसेच उत्तर भारतात रस्तेमार्ग आणि हवाई वाहतुकीवर परिणाम झाला.

दिल्लीत दृश्यमानता १०० मीटरपर्यंत कमी झाली. दिल्लीच्या पालम विमानतळावरील दृश्यमानता सोमवारी संध्याकाळी सातच्या दरम्यान ९०० मीटर होती. ती रात्री साडेअकराच्या सुमारास ३०० मीटरपर्यंत कमी झाली. तर बुधवारी सकाळी दृष्यमानता १०० मीटरपेक्षाही कमी होती. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात त्याचप्रमाणे, दक्षिण दिल्ली, नेहरुप्लेस, गुरुग्राम व ग्रेटर नोएडा भागातही दाट धुके दिसले. साहजिकच या धुक्यामुळे विमानांच्या उड्डाणांवर व उतरण्यावर परिणाम झाला. काल सकाळी सात विमाने जयपूर आणि लखनौकडे वळविण्यात आली. आग्रा, अमृतसर, हिंडन, पालम, चंडीगड, पठाणकोट येथील विमानतळांवरही कमी दृश्यमानता होती.

# गोव्यातील कोडलीचा खाणपट्टा जेएसडब्ल्यू कंपनीच्या ताब्यात

■ पणजी

**गोवा** राज्य सरकारच्या खाण खात्याने पुकारलेल्या ई-लिलावात कोडली खाणपट्टा जेएसडब्ल्यू स्टील या कंपनीने जिंकला. या कंपनीने बोली भावापेक्षा ९२.६ टक्के जास्त बोली लावत हा खाणपट्टा आपल्या ताब्यात घेतला आहे.देशातील सर्वात मोठी लोहखाण म्हणून कोडली खाण ओळखली जाते. यापूर्वी ती सेसा गोवा आणि नंतर वेदान्ताकडे होती. राज्य सरकारने तीन खाणपट्ट्यांचा लिलाव पुकारला आहे. त्यासाठी तांत्रिकदृष्ट्या पात्र कंपन्यांना आर्थिक बोली लावण्यासाठी पात्र ठरविले जाते. काल या बोलीसाठी १० कंपन्या पात्र ठरल्या.

# करोडोच्या हिऱ्यांसाठी कतारच्या दोन राजघराण्यांत मोठा वाद

■ दोहा

**कतारच्या** राजघराण्यातील दोन सदस्य एकमेकांच्या विरोधात आले आहेत. लाखो डॉलर किमतीच्या हिऱ्यांच्या वादात दोघे भाऊ सोमवारी ११ नोव्हेंबर रोजी लंडन उच्च न्यायालयात पोहोचले. आता या वादावर न्यायालय निर्णय देणार आहे. दोन्ही बाजू एकमेकांविरोधात आरोप करत आहेत.

कतारचे शासक शेख तमीम बिन हमाद अल थानी यांचे चुलत भाऊ शेख हमद बिन अब्दुल्ला अल थानींनी माजी सांस्कृतिक मंत्री शेख सौद बिन मोहम्मद अल थानींच्या नातेवाईकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. हमाद बिन अब्दुल्ला यांच्या मालकीची कंपनी ७० कॅरेटचे रत्न खरेदी करण्याचा कथित अधिकार लागू करण्याचा प्रयत्न करत आहे. शेख हमद बिन अब्दुल्ला अल थानी यांच्या क्यूआयपीसीओ कंपनीकडे 'आयडॉल्स आय' नावाचा हिरा आहे.

# अमेरिकेच्या राष्ट्रीय तपास संस्थेच्या संचालकपदी तुलसी गब्बार्ड यांची निवड

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेचे** नियोजित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देशाच्या राष्ट्रीय तपास संस्थेच्या अध्यक्षपदी भारतीय वंशाच्या तुलसी गब्बार्ड यांची नियुक्ती केली आहे.

गब्बार्ड याआधी डेमॉक्रेटीक पक्षामध्ये होत्या. त्यांनी सन २०२१ ते २०२३ अशी तीन वर्षे डेमॉक्रेटीक पार्टीमधून हवाई देशाचे प्रतिनिधीत्व केले आहे. २०२४ साली त्यांनी ट्रम्प यांना पाठिंबा दिला. त्यानंतर ट्रम्प यांनी आता त्यांची या महत्त्वाच्या पदावर नियुक्ती केली आहे. तुलसी गब्बार्ड यांनी आपल्या आजवरच्या राजकीय वाटचालीत धाडसी वृत्तीचे दर्शन घडविले आहे. घटनात्मक अधिकारांचे रक्षण आणि शांतता प्रस्थापित करण्याचे त्यांचे प्रयत्न यापुढेही सुरूच राहतील, अशी अपेक्षा करतो, असे त्यांच्या नियुक्तीची घोषणा करताना ट्रम्प म्हणाले.

# 'श्रीकृष्ण जन्मभूमी' प्रकरणातील याचिकाकर्त्याला पाकमधून धमकी

■ अलाबाबाद

**अलाहाबाद** उच्च न्यायालय बॉम्बने उडवून देवू, अशी धमकी पाकिस्तानमधून श्रीकृष्ण जन्मभूमी प्रकरणातील मुख्य याचिकाकर्ते आणि श्री कृष्ण जन्मभूमी मुक्ती निर्माण ट्रस्टचे अध्यक्ष आशुतोष पांडे यांना मिळाली आहे. त्यांनी या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल केली असून या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. आशुतोष पांडे हे शामलीत येथील कांधला येथील रहिवासी आहेत. अलाहाबाद उच्च न्यायालयाने बॉम्बने उडवून देऊ, अशी धमकी देणारा संदेश एका पाकिस्तानी क्रमांकावरून आल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

# उपविभागीय दंडाधिकाऱ्याला मारले राजस्थानच्या सामरावता गावात हिंसाचार

■ टोंक

**अपक्ष** उमेदवार नरेश मीणा यांनी उपविभागीय दंडाधिकाऱ्याला कानशिलात लावल्यामुळे, सामरावता गावात हिंसाचार झाल्याने मोठा तणाव निर्माण झाला. राजस्थानात काल ७ विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीचे मतदान पार पडले.

टोंक जिल्ह्यात देवली उनियारा पोटनिवडणुकीदरम्यान काँग्रेसचे बंडखोर व अपक्ष उमेदवार नरेश मीणाने ईएव्हीएम यंत्रावर त्यांचे निवडणूक चिन्ह स्पष्ट दिसत नसल्याचा निवडणूक आयोगावर आरोप केला होता. यावेळी मालपुराचे उपविभागीय दंडाधिकारी अमित कुमार चौधरी आणि नरेश मीणा यांच्यात वाद झाला. मीणा यांचा संयम सुटला आणि त्यांनी अमित कुमार चौधरी या अधिकाऱ्याच्या कानशिलात दिली. या घटनेनंतर आपल्या मागण्या मांडण्यासाठी नरेश मीणा समरावता गावात आंदोलनाला बसले व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या ऐकून आश्वासन द्यावे, अशी मागणी केली.

# इटलीच्या सिसिलीमध्ये पूर अनेक वाहने पाण्यात वाहून गेली

■ रोम

**इटलीच्या** सिसिली शहरात काल झालेल्या मुसळधार पावसामुळे भीषण पूरस्थिती निर्माण झाली. विशेषतः टोर्रे आर्चिरफी शहरात पुराने हाहाकार माजवला. अनेक कार पाण्याच्या लोंढ्याबरोबर समुद्रात वाहून गेल्या.

सिसिलीमधून आपत्कालीन सेवा विभागाकडे पुराच्या पाण्यात अडकलेल्या लोकांचे मदतीसाठी कॉल आले. पुरामुळे जीवितहानी झाली नाही. तसेच कोणी बेपत्ता असल्याचे वृत्त नाही, असे आपत्कालीन सेवा विभागाने आज सांगितले. मागील काही वर्षांपासून इटलीमध्ये पर्यावरण बदलाचे दुष्परिणाम नैसर्गिक आपत्तींच्या रुपाने वारंवार दिसून आले आहेत. उष्णतेची लाट, दुष्काळ, वादळे आणि पूर अशा अनेक आपत्तींचा सामना या देशाला करावा लागला आहे.

# रशियात संतती प्रतिबंधास प्रोत्साहन देण्यावर बंदी घातली

■ मॉस्को

**रशियन** सरकार नवा कायदा आणणार आहे. या कायद्यांतर्गत देशात लोकांना मुले होऊ नयेत यासाठी प्रोत्साहन देण्यावर बंदी असेल. कोणत्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर असा कोणताही कंटेंट चालवला जाणार नाही, जो लोकांना मुले होण्यापासून प्रतिबंधित करतो.

रशियन संसदेचे कनिष्ठ सभागृह स्टेट ड्यूमाने १२ नोव्हेंबर रोजी यासंबंधीचा प्रस्तावही मंजूर केला आहे. आता ते २० नोव्हेंबरला वरिष्ठ सभागृहात मांडले जाणार आहे. येथून पास झाल्यानंतर ते व्लादिमीर पुतिन यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवले जाईल. पुतिन यांची मंजुरी मिळाल्यानंतर हा कायदा लागू होईल. वास्तविक, सतत कमी होत असलेल्या लोकसंख्येमुळे रशिया त्रस्त आहे. जूनमध्ये देशात जन्मलेल्या मुलांची संख्या १ लाखांपेक्षा कमी राहिली आहे. युक्रेन युद्धात रशियाचे ६ लाखांहून अधिक लोक मारले गेले किंवा अपंग झाले.

# मलबार हिलमधील राखीव भूखंडाच्या लिलावास विरोध

**प्रक्रिया थांबविण्याची आमदार लोढांची मागणी**

■ मुंबई

**मलबार** हिल परिसरातील उद्यानासाठी राखीव असलेली जागा व्यापारी कारणासाठी वापरण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे. या निर्णयास नागरिक आणि पर्यावरण कार्यकर्त्यांनी विरोध केला आहे. भाजपचे स्थानिक आमदार मंगलप्रभात लोढा यांनी या प्रकरणाची दखल घेऊन या मोकळ्या भूखंडाच्या लिलावाची प्रक्रिया थांबवण्याबाबत महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांना



पत्राद्वारे विनंती केली आहे.

मुंबई पालिकेसारख्या नामांकित शासकीय संस्थेकडून राखीव भूखंडाचा लिलाव करण्याचा निर्णय धक्कादायक आहे. ज्या मूळ कारणासाठी हा भूखंड आरक्षित आहे. त्यासाठी तो वापरला जायला हवा. मुंबई महापालिकेने त्यांच्या मागणीचा आदर करावा, असे मंगलप्रभात लोढा यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. मलबार हिलमध्ये रमाबाई आंबेडकर मार्गाशेजारील बेस्टचे रिसिव्हिंग स्टेशन असलेला दोन हजार ४३२ चौरस मीटरचा भूखंड खासगी व्यापारासाठी भाड्याने देण्याचा निर्णय महापालिकेकडून घेण्यात आला होता.

# शिवाजी पार्कवर १७ नोव्हेंबरला सभा घेण्यास मनसेला परवानगी

■ मुंबई

**विधानसभा** निवडणुकीच्या प्रचारासाठी १७ नोव्हेंबरला दादरच्या शिवाजी पार्कवर जाहीरसभा घेण्यास मनसे, शिंदे गट आणि ठाकरे गट आग्रही होता. मात्र मुंबई महापालिकेने मनसेला जाहीरसभा घेण्यास परवानगी दिल्यामुळे शिंदे आणि ठाकरे गटाला मोठा दणका बसला आहे.

निवडणुकीचा प्रचार १८ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजता संपणार आहे. आदल्या दिवशी १७ नोव्हेंबर रोजी शेवटची प्रचारसभा राजकीय पक्षांना घेता येणार आहे. त्यामुळे शिवाजी पार्कवर जाहीर सभा घेण्यासाठी मनसे, शिंदे आणि ठाकरे गटाने मुंबई महापालिकेकडे अर्ज केले होते. त्यानंतर परवानगीचा वाद हा नगरविकास विभागाकडे गेला. या सभेसाठी मनसेकडून सर्वात आधी अर्ज आला होता. परिणामी मनसेला शिवाजी पार्कवर जाहीर सभा घेण्यास परवानगी देण्यात आली.

# नाशिकच्या किरकोळ बाजारात कांद्याच्या दराने शंभरी गाठली

■ निफाड

**परतीच्या** पावसाने जिल्ह्यात १३ हजार हेक्टरवरील कांदा पिकाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे दिवाळीनंतर बाजारात होणारी नव्या लाल कांद्याची आवक कमालीची घटली आहे. या दोन्ही परिस्थितीमुळे घाऊक बाजारात कांदा सरासरी ४२ ते ६० रुपये प्रति किलोवर गेला आहे. तर किरकोळ बाजारात कांद्याच्या दराने किलोमागे शंभरी गाठली आहे.

सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात उन्हाळी कांदा संपतो आणि नोव्हेंबरमध्ये नवीन लाल कांदा बाजारात येतो. याकाळात कांद्याचे



दर वाढतात. मात्र यावर्षी परतीच्या पावसाने कांद्याचे गणित बिघडून टाकले आहे. ऑक्टोबर महिन्यात चांदवड, देवळा, पेठ, सिन्नर, नाशिक व निफाड भागास परतीच्या पावसाने झोडपले होते. सुमारे १३ हजार हेक्टरवरील कांद्याचे नुकसान झाले. ज्यांनी आधी लागवड केली होती, त्यांचा कांदा आता काढणीवर येणार होता. शेतात पाणी साचल्याने तो खराब झाला. सिन्नरमध्ये एका शेतकऱ्याला शेतात ट्रॅक्टर फिरवण्याची वेळ आल्याचे महाराष्ट्र कांदा उत्पादक संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी सांगितले. एरवी, नोव्हेंबरपासून लाल कांद्याची आवक वाढू लागते. परंतु, या परिस्थितीमुळे चालू नोव्हेंबर महिन्यात आवक जेमतेम राहील.

# भाजपाचे उमेदवार जयकुमार गोरे यांना कोविड घोटाळा प्रकरण अडचणीत आणणार

■ सातारा

**माण** विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे उमेदवार आणि विद्यमान आमदार जयकुमार गोरेंना कोविड घोटाळा प्रकरण चांगलेच महागात पडण्याची शक्यता आहे. या घोटाळ्याचा तपास कोणाच्याही दबावाखाली करू नका, असे उच्च न्यायालयाने मंगळवारी सातारा पोलीस अधीक्षकांना बजावले.

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे व न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने या घोटाळ्याचा निःसंदेह तपास करून त्याचा अहवाल पुढील सुनावणीत सादर करा, असे आदेशही सातारा पोलिसांना दिले आहेत. २७ नोव्हेंबर रोजी यावर पुढील सुनावणी होणार आहे. साताऱ्यातील मायणी येथील कोरोना उपचार केंद्रातील घोटाळ्याच्या सखोल चौकशीसाठी दीपक देशमुख यांनी ॲड. वैभव गायकवाड यांच्यामार्फत याचिका केली आहे. या याचिकेची गंभीर दखल घेत न्यायालयाने या घोटाळ्याच्या चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार गोरे यांच्यासह अन्य जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. याचा तपास योग्य प्रकारे सुरू असल्याची माहिती सातारा पोलिसांकडून न्यायालयाला देण्यात आली.

या सुनावणीला सातारा पोलीस अधीक्षक समीर शेख हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर होते. तुमच्यावर कोणाचा दबाव आहे का, अशी विचारणा न्यायालयाने पोलीस अधीक्षक शेख यांना केली.

# 'कंक्राडी'च्या पूर नियंत्रण रेषा आखणीचे काम मार्गी लागणार

■ डहाणू

**डहाणू** शहरातून वाहणाऱ्या कंक्राडी नदीच्या पूर नियंत्रणासाठी आवश्यक रेषा आखण्याचे काम आता मार्गी लागणार आहे. राष्ट्रीय हरित लवादाने मे २०२२ मध्ये दिलेल्या आदेशानुसार कंक्राडी नदीच्या पूर नियंत्रणासाठी लाल आणि निळी रेषा आखणे आवश्यक ठरवले होते. मात्र निधीअभावी हे काम रखडले होते. आता पाटबंधारे विभागाने निधी मंजूर करून घेतला असून, ५ नोव्हेंबर रोजी पाटबंधारे विभाग आणि कंत्राटदारांनी नदी क्षेत्राची पाहणी केली आहे.

कंक्राडी नदीच्या किनाऱ्यालगत अतिक्रमण केल्याने पावसाळ्यात नदीचे पाणी ओसंडून शहरात प्रवेश करते. ज्यामुळे पूरपरिस्थिती निर्माण होते. गेल्या काही वर्षांत नदीपात्रात अतिक्रमणाचे प्रमाण वाढले असून, या समस्येवर उपाययोजना म्हणून सोसायटी फॉर फास्ट जस्टिस, डहाणू शाखेने २०१७ साली राष्ट्रीय हरित लवादात याचिका दाखल केली होती. निकाल सोसायटीच्या बाजूने लागल्याने कंक्राडी नदीच्या पूर नियंत्रण रेषा आखण्याचे आदेश देण्यात आले.

# मतदानामुळे मुंबई विद्यापीठाने परीक्षा वेळापत्रक बदलले!

■ मुंबई

**विधानसभा** निवडणुकीतील मतदानाच्या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाच्या तीन दिवसांच्या परीक्षा वेळापत्रकात बदल केला. विद्यापीठाने १९, २० आणि २१ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. या दिवशीच्या परीक्षेचे बदललेले वेळापत्रकही विद्यापीठाने जाहीर केले आहे.

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये मतदान केंद्र असतात. विद्यापीठाच्या कलिना संकुलातील इमारतींमध्येही मतदान केंद्र आणि निवडणूक अधिकाऱ्यांची कार्यालये असतात. विद्यापीठाने १९, २० व २१ नोव्हेंबरला होणाऱ्या परीक्षांच्या तारखा बदलल्या आहेत. विद्यापीठाने या दिवसांचे नवीन परीक्षा वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार १९ नोव्हेंबरची परीक्षा ३० नोव्हेंबर, २० नोव्हेंबरची परीक्षा ७ डिसेंबर, २१ डिसेंबरची परीक्षा १४ डिसेंबरला घेण्यात येणार आहे.

# नंदुरबारमधील पाच केंद्रांवर दुपारी ३ वाजेपर्यंतच मतदान

**जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची माहिती**

■ नंदुरबार

**अक्कलकुवा** विधानसभा मतदारसंघातील ५ मतदान केंद्र ही अतिदुर्गम श्रेणीत मोडतात. त्यामुळे निवडणूक आयोगाने या पाच मतदान केंद्रांवरील मतदानाची वेळ २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते दुपारी ३ अशी निश्चित केली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी दिली.

अक्कलकुवा विधानसभा मतदारसंघातील नर्मदा काठावरील अतिदुर्गम (बार्जने जाणारे) मणीबेली, चिमलखेडी, बामणी, डनेल व मुखडी ही ५ मतदान केंद्र अत्यंत दुर्गम भागात असून, सातपुडा पर्वत रांगेत नर्मदा काठावर आहेत. या मतदान केंद्रांवर पोहोचण्यासाठी प्रथम रस्ते मार्ग, नंतर बोटीतून प्रवास करावा लागतो व त्यासाठी वेळही जास्त लागतो. मतदानानंतर परतताना देखील तेवढाच वेळ लागतो. त्यामुळे या मतदान केंद्रावर मतदान सकाळी ७ ते दुपारी ३ वाजेपर्यंत होणार आहे, यासाठी निवडणूक आयोगाने मान्यता दिलेली आहे, असेही डॉ. सेठी यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

# गद्दारी करणाऱ्या गणोजीला सुट्टी नाही पवारांचा वळसे-पाटलांवर हल्लाबोल

■ पुणे

**गद्दारी** करणाऱ्या गणोजीला आता सुट्टी नाही, असा हल्लाबोल शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी अजित पवार गटाचे नेते व राज्याचे सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्यावर केला. शरद पवार काल मंचर येथे महाविकास आघाडीचे उमेदवार देवदत्त निकम यांच्या प्रचारासाठी उपस्थित होते.

शरद पवार म्हणाले की, साडेतीनशे वर्षांपूर्वी गणोजी शिर्केने छत्रपती संभाजी महाराजांशी गद्दारी केली, ती गद्दारी अद्याप महाराष्ट्र विसरलेला नाही. त्यामुळे गणोजीला आता सुट्टी नाही. ज्यांनी गद्दारी केली, त्यांना आता सुट्टी नाही. ज्यांना पद, शक्ती आणि अधिकार दिले, तेच गद्दार झाले. मी दिलीप वळसे-पाटील यांना संधी दिली. आमदार केले, मंत्री केले. विधानसभेचे अध्यक्ष केले. मात्र त्यांनी विचाराशी गद्दारी केली आणि आमची साथ सोडली. जो गद्दारी करतो, त्याला माफी नसते. या निवडणुकीत त्यांना पराभूत करत धडा शिकवा.

ते पुढे म्हणाले की, स्वर्गीय दत्तात्रय वळसे-पाटील यांनी मला साथ दिली. ते कायम माझ्यासोबत राहिले. तसेच त्यांच्या मुलाला माझ्या सोबत काम करण्याची इच्छा होती.

# सोलापुरात सूर्यास्तानंतर विमान उड्डाणास मनाई




■ सोलापूर

**सोलापूर** विमानतळ पुन्हा एकदा सेवेसाठी सज्ज झाला असला तरी या विमानतळावर रात्रीच्या वेळी उड्डाण करण्याची सोय नाही. त्यामुळे निवडणूक प्रचारासाठी आलेल्या व्हीव्हीआयपी, व्हीआयपी नेत्यांसह कामानिमित्त आलेल्या उद्योजकांना दिवस मावळण्यापूर्वीच सोलापुरातून उड्डाण करावे लागत आहे.

सोलापुरातून विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशाला उशीर झाला तर मुक्काम करावा लागतो. कारण सूर्य मावळल्यानंतर या विमानतळावरून उड्डाणास परवानगी नाही. त्यामुळे सोलापुरात प्रचार सभांसाठी आलेल्या व्हीआयपींच्या विमानांना सूर्यास्तापूर्वीच उड्डाण करावे लागत आहे. मंगळवेढ्यातील सभेसाठी आलेले 'मनसे' प्रमुख राज ठाकरे यांना त्याच दिवशी अमरावतीला सभेसाठी जायचे होते. मात्र, सोलापूर आणि अमरावती विमानतळावरही नाईट लॅण्डिंगची सोय नसल्याने संध्याकाळी पावणेपाच वाजताच त्यांनी सोलापुरातून उड्डाण केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही मंगळवारी सभा संपल्यावर लगेचच विमानतळ गाठावे लागले.

# 'महालक्ष्मी' २१ डब्यांचीच! प्रवाशांची घोर निराशा

■ कोल्हापूर

**कोल्हापूर**-मुंबई मार्गावर धावणाऱ्या महालक्ष्मी एक्स्प्रेस व कोल्हापूर-तिरुपती मार्गावर धावणाऱ्या हरिप्रिया एक्स्प्रेसला दोन जादा डबे जोडण्याची घोषणा रेल्वेने केली. त्यानुसार कालपासून दोन जादा डबे वाढवले. मात्र, स्लीपरचे दोन डबे कमी करून त्याऐवजी हे दोन डबे वाढवले आहेत. त्यामुळे या दोन्ही एक्स्प्रेस पूर्वीप्रमाणेच २१ डब्यांच्याच राहणार आहेत. त्यामुळे प्रवाशांची मात्र निराशाच झाली असून, आता वेटिंगचे प्रमाण कायम राहणार आहे.

'महालक्ष्मी व हरिप्रिय' एक्स्प्रेसला प्रवाशांची गर्दी असते. यामुळे या दोन्ही गाड्यांसाठी




प्रतीक्षा यादीही मोठी असते. या गाडीला सध्या २१ डबे असून, त्यात आणखी दोन डबे वाढवावेत, अशी मागणी सातत्याने होत आहे. तसेच या गाडीच्या जनरल डब्यांचीही संख्या वाढवावी, अशी मागणी आहे. या पार्श्वभूमीवर या दोन्ही गाड्यांना दक्षिण-मध्य रेल्वेने दोन जादा डबे जोडण्याचा निर्णय घेतला. डबे वाढवल्यामुळे प्रवासी क्षमता वाढेल, अशी शक्यता होती. मात्र, आता फोल ठरली आहे. या गाडीला असणाऱ्या स्लीपरच्या ११ डब्यांपैकी दोन डबे कमी करण्यात आले. त्याऐवजी एसई-१ आणि एसई-२ असे दोन जादा डबे जोडण्यात आले. यामुळे या दोन्ही गाड्या पूर्वीप्रमाणेच २१ डब्यांच्या राहणार आहेत. विशेष म्हणजे, या जादा डब्यांना स्लीपर क्लासचा दर्जा आणि तिकीट असल्याने

# माजी खा. प्रसाद तनपुरेंची कार्यकर्त्याला धमकी! संभाषणाची ऑडिओ क्लिप व्हायरल

■ राहुरी

**शरद** पवार गटाचे राहुरीचे उमेदवार विद्यमान आ. प्राजक्त तनपुरे यांचे वडील माजी खा. प्रसाद तनपुरे यांनी धनगर समाजाचे नेते अण्णासाहेब बाचकर यांना फोनवरून धमकी दिल्याच्या संभाषणाची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली. या प्रकरणाचा भाजपा पदाधिकाऱ्यांनी निषेध केला आहे. बाचकर म्हणाले की, राहुरीतील



महायुतीचे उमेदवार शिवाजीराव कर्डिले यांचा प्रचार केल्यामुळे माजी खा. प्रसाद तनपुरे यांनी मला फोनवर धमकी दिली की, तनपुरेंच्या विरोधात जाणे इतके सोपे नाही. तुला समजून सांगतो की, तू प्राजक्तचे काम कर, नाहीतर शांत बस. त्यांनी धमकी दिल्याने माझ्या जीवाला तनपुरे यांच्याकडून धोका आहे. याबाबत पोलीस स्थानकाला तक्रार करून संरक्षण मागणार आहे.


# पुणे महापालिका अधिकारी कर्मचाऱ्यांना हेल्मेटसक्ती

■ पुणे

**महापालिकेची** मुख्य इमारत तसेच शहरातील इतर कार्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हेल्मेटसक्ती करण्यात आली आहे. हेल्मेट न घातल्यास त्यांना महापालिकेच्या आवारात प्रवेश देऊ नये तसेच वाहन पार्किंग करण्यासही मनाई करावी, असे आदेश महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी काढले आहेत.

रस्ते अपघात रोखण्यासाठी हेल्मेटचा वापर तसेच वाहतूक नियमांचे पालन स्वतःपासून सुरू करण्याची गरज असल्याने विभागीय आयुक्तांनी काही महिन्यांपूर्वी सर्व शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना हेल्मेटसक्ती करण्याचे आदेश काढले आहेत. हे आदेश महापालिकेलाही मिळाले असून, त्यानुसार पालिका कर्मचाऱ्यांना आजपासून हेल्मेट वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१०७६



**आडवे शब्द –**

१. खरे, वास्तव २. कामगारांवर देखरेख ठेवणारा ५. विष्णू ९. अचूक (शस्त्र, उपाय) ११. आस्था, जिव्हाळा १२. गर्दभ १४. सावळागोंधळ १५. बाप, पिता १७. मिठी १८. सोन्याची शुद्धता २०. आदरभाव २२. मैफलीतले तालवाद्य २४. परिधान करणे २५. तळाकडील भाग २६. कळस २८. फळातील मगज ३०. प्रथम ३२. अब्रू ३३. दणका ३५. क्षयतिथी ३६. तीन रस्ते मिळतात ती जागा ३८. थकवा ३९. गुन्हेगारी कृत्य ४१. अंकुर ४२. शिकाऱ्याचे लक्ष्य ४४. तनया ४५. बहरणे, फुलणे ४७. अग्निसंस्कार ४९. खतम ५२. धुपाचे भांडे ५३. खेळकर, जळ, मुलांचे एक नाव ५५. समाविष्ट ५६. घुसमट ५८. टोचणी ५९. हत्ती ६०. सळई ६१. डोक्याला बांधण्याचा रुमाल ६३. मतभेद ६४. जगणे ६५. साथीच्या रोगाचा फैलाव ६७. चांदणी ६९. जेव्हा ७१. उष्ण (पाणी) ७३. नशीब ७४. नीरव ७५. शकुन बघण्याची कथित विद्या ७६. श्रीकृष्णाची आई ७८. वेढा ८०. रमलेला ८२. वाराणशी ८३. माळ, बरोबरी ८५. वायू ८६. जिंकलेला ८९. बंगला, वास्तु ९१. मत्स्य ९३. यावर्षी ९४. उसळीचे एक धान्य ९५. शरम ९६. अत्तराचा बोळा ९८. किंचितही अंश ९९. श्रीराम १०२. ज्ञात, ठाऊक १०५. कृष्णाचा मोठा भाऊ १०६. लोणी १०७. मोठ्या वाहनातले एक इंधन १०९. नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमामुळे प्रसिद्ध पुण्यातील शिवकालीन गड १११. अंगावरील वस्त्रानिशी स्नान ११२. ऊन ११३. बैरागी ११४. अतिशय जास्त

**उभे शब्द –**

१. तेजस्वी २. तिखट चवीचे कंदमूळ ३. मृत ४. कळी, अंकुर ६. रात्र ७. बहाणा, खोटे कारण ८. दूर ९. तोकडा १०. न्हाणीघर, धरणातून पाणी सोडण्याची यंत्रणा ११. शैली १३. लग्गा १६. नम्र १९. चौथरा, वेदी २०. उपसागराहून लहान जलाशय २१. रथ हाकणारा २३. गव्हाची खीर २६. शेंडी २७. मध्यस्थी २८. वेगवान २९. उत्तर ३१. कमी दर्जाचे ३२. काळ्या बिया व केशरी गराचे गोड फळ ३४. खेकसणे ३७. पत्ता, ठिकाण ४०. जुन्या कपड्याचा तुकडा, फडके ४३. घायाळ ४६. धनादेशाची रक्कम खात्यात जमा करून घेणे ४८. मिठाईवाला ५०. इच्छा ५१. गोडी, माधुर्य ५२. जबाबदारी ५३. अखंड ५४. जीवघेणे, धोक्याचे ५५. गांधीजींचा आश्रम ५७. नशा आणणारे, अमली ५८. तलाव ६०. अरण्य, जंगल ६२. किफायतशीर ६४. शेतीची गुरे ६६. राजपुत्राची, राजकन्येची आजी ६८. आदला दिवस ७०. रान ७२. मेघ ७७. बटाट्याचा, रताळ्याचा उपवासाला चालणारा पदार्थ ७९. संधी नाकारलेला, वंचित ८१. गमतीदार ८२. आसाम आणि गोव्यातील प्रसिद्ध देवता ८४. विष्णूची पत्नी, लक्ष्मी ८७. आसपास ८८. मोकळ्या मनाचा, प्रांजळ ९०. भेद, अंतर ९२. फळावरील आवरण, संवत्सर ९४. द्रुत हालचाली करणारा ९७. होम, यज्ञ १००. एक दिवाभीत पक्षी, लक्ष्मीचे वाहन १०१. अग्नी, जाळ १०२. लगामाची दोरी १०३. बिजली, विद्युत १०४. आकर्षण १०८. उडी १०९. समुद्र, एक प्रसिद्ध नदी ११०. अहंकार •

**नवाकाळ कोडे क्रमांक १०७५ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. खिल्ली ३. सांगाती ५. बेअकली १०. पन्ना ११. घरकोंबडा १३. लालमहाल १५. वपा १७. कैफियत १९. वगर २०. प्रस्थान ठेवणे २२. कीव २३. अतीत २४. दंश २५. सहोदर २७. थक्क २८. खोंड २९. भला ३२. हल्ला ३३. बंडलबाज ३६. वध ३८. नमकहराम ४०. शिरस्ता ४१. हेम ४२. तड ४३. माळकरी ४५. बारदान ४६. आदिमाया ४८. सारंगधर ५०. चाड ५१. खांड ५२. सुवास ५३. असोशी ५४. गाजर ५६. जड ५७. लेप ५८. राई ५९. चापलूस ६१. सखा ६३. कावा ६४. आयतन ६५. अबलख ६७. विपरीत ६९. पटाईत ७१. भग्न ७२. तार ७३. काक पक्षी ७४. सारी ७५. चौकस ७७. जहाज ७९. वाढ ८०. डाव ८१. कसोटी ८२. बेहद्द ८३. तमा ८४. पलंग ८५. वाढपी ८६. निकाल ८७. रंभा ८९. नाक ९०. डुलकी ९२. वारंवार ९३. भगीरथ ९५. पहाट ९६. राजीव ९७. खोडा ९८. रंगत

**उभे शब्द** : १. खिन्नावस्था २. भिरकावणे ३. सांबर ४. गाडा ६. अच्युत ७. लीलावती ८. समर ९. कालवश १२. बेफिकीर १४. लगत १६. पानगी १८. यव २०. प्रलोभन २१. टाहो २३. अक्कल २४. दंडवत २५. सल्ला २६. दप्तरदिरंगाई २७. थडगे ३०. लामणदिवा ३१. मोहमाया ३२. हम करे सो कायदा ३४. बाहेरचा ३५. जमदाड ३७. धडपड ३९. राळ ४४. अधर ४६. आसुरी ४७. मासलेवाईक ४९. गज ५१. खांडसरी ५५. चपखल ५८. रानभरी ५९. चाल ६०. सविता ६२. खातरजमा ६३. काटा काढणे ६६. बळकटी ६८. परज ७०. तपमापक ७४. साव ७५. चौसोपी वाडा ७६. सहल ७८. हातभार ८०. डागडुजी ८१. कढ ८२. बेकार ८५. वाकी ८६. निवास ८७. रंगीत ८८. झोप ८९. नाट ९१. लव ९३. भग ९४. थडी

# मोदींचे युतीला विजयी करण्याचे आवाहन

पान १ वरून

तर ओबीसी जाती-जातीमध्ये विभागले जातील, त्याचा फायदा घेण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. काँग्रेसचे एकदा सरकार आले की ते एससी, एसटी, ओबीसींचे आरक्षण काढून टाकतील. त्यामुळेच आपल्याला जागृत होऊन एक व्हावे लागेल. 'एक है तो सेफ है' हे लक्षात ठेवावे लागेल.

ते पुढे म्हणाले की, एकीकडे संभाजी महाराजांना मानणारे देशभक्त आहेत. तर दुसरीकडे, औरंगजेबाचे गुणगान गाणारे लोक आहेत. संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे की, छत्रपती संभाजीनगर नाव देण्याची मागणी बाळासाहेब ठाकरे यांनी केली होती. आघाडी सरकार अडीच वर्षे सत्तेत होते, पण काँग्रेसच्या दबावामुळे या लोकांची नाव बदलण्याची हिंमत झाली नाही. पण महायुतीने सत्तेत आल्यानंतर लगेच ते नामांतर पूर्ण केले. आम्ही बाळासाहेबांची इच्छा पूर्ण केली. पण छत्रपती संभाजीनगर नाव दिल्याने सर्वात जास्त त्रास काँग्रेस आणि आघाडीला झाला. हा निर्णय बदलण्यासाठी लोक न्यायालयात गेले होते. ज्यांना संभाजी महाराजांच्या नावावर आक्षेप आहे आणि त्यांच्या मारेकऱ्यात आपला देव दिसतो ते लोक महाराष्ट्र आणि मराठी स्वाभिमानाच्या विरोधात उभे आहेत. अशा लोकांना महाराष्ट्र कधीच स्विकार करणार नाही. महाराष्ट्राला विकसित भारताच्या संकल्पाचे नेतृत्व करायचे आहे. भाजपा आणि महायुती याच दिशेने काम करत आहे.

# 'बटेंगे तो कटेंगे'! महायुतीत गोंधळ

पान १ वरून

वारंवार मांडली. भाजपाच्या नेत्या पंकजा मुंडे यांनीदेखील या घोषणेला काल उघड विरोध दर्शविला. महाराष्ट्रात 'बटेंगे तो कटेंगे' सारख्या घोषणांची आवश्यकता नाही. केवळ मी त्या पक्षातील आहे म्हणून अशा घोषणांचे समर्थन करणार नाही. प्रत्येक माणसाला येथे जगण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे ही नेत्यांची जबाबदारी आहे. इथे विकासावरच बोलले पाहिजे. त्यामुळे असे विषय महाराष्ट्रात आणण्याची गरज नाही, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. नंतर मात्र मी असे विधान केले नाही, मला स्टार प्रचारक पदावरून दूर करण्यासाठी कुणीतरी राजकारण करीत आहे असे म्हणत त्यांनी नंतर आपल्या वक्तव्यापासून घुमजाव केले.

भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनीही अप्रत्यक्षपणे 'बटेंगे तो कटेंगे' पासून दूर राहण्याचा प्रयत्न केला. मी विचारधारा मानणारा नेता आहे. जात, धर्म, पंथ आणि भाषा या मुद्यांवर मी काम करू शकत नाही. जो मला मत देईल त्याचेही काम करणार आणि जो मत देणार त्याचेही काम करणार, असे म्हणत गडकरी यांनी राजकारणात धार्मिक मुद्दे आणण्याची गरज नाही, असे सुचविण्याचा प्रयत्न केला.

# कोचिंग सेंटरच्या फसव्या जाहिरातींवर केंद्र सरकारचे कठोर निर्बंध लागू

पान १ वरून

मंत्रालयाकडे तक्रारही केली आहे, असे खरे यांनी सांगितले. सरकारी सेवेत असतानाही जास्त पैसे कमवण्याच्या लालसेने एखाद्या विशिष्ट कोचिंग सेंटरची जाहिरात करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असेह खरे यांनी सांगितले. कोचिंग सेंटरच्या जाहिरातींमध्ये काही विद्यार्थी एखाद्या विशिष्ट कोचिंग क्लासमधून कोर्स पूर्ण केल्यामुळे आपल्याला सरकारी नोकरी मिळाली, असा दावा करताना दिसतात. मात्र नव्या मार्गदर्शक तत्वानुसार अशा प्रकारे जर एखाद्या विद्यार्थ्याला खरोखरच एखाद्या विशिष्ट कोचिंग सेंटरबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया द्यायची असेल तर सरकारी सेवेत रुजू होण्यापूर्वी त्याला तसे करण्याची मुभा असेल, सरकारी सेवेत रुजू झाल्यानंतर त्याला असे करता येणार नाही, असे खरे यांनी स्पष्ट केले. जोपर्यंत एखादा विद्यार्थी सरकारी सेवेत रुजू होत नाही तोपर्यंत त्याला सरकारी सेवेसंबंधीचे नियम लागू होत नाहीत. त्यामुळे त्याने कोणासाठी जाहिरात करावी किंवा करू नये यावर सरकारचे काहीही निर्बंध नसतील. मात्र सरकारी सेवेत रुजू झाल्यानंतर अशाप्रकारे कोणत्याही संस्थेशी व्यावसायिक करार करताना त्यांना सेवासंबंधीच्या नियमांचे पालन करावेच लागेल, असे खरे पुढे म्हणाल्या.

# महाराष्ट्रसह गुजरातमध्ये ईडीच्या पथकांची २३ ठिकाणी छापेमारी

■ मालेगाव

**महाराष्ट्रसह** गुजरातमध्ये ईडीने २३ ठिकाणी छापेमारी केली. मालेगाव येथील मर्चंट बँकेच्या शाखेत १२ बेरोजगार तरुणांच्या खात्यांवरून १२५ कोटी रुपयांचा आर्थिक व्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. हे पैसे 'व्होट जिहाद'साठी वापरल्याचा आरोप भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. या प्रकरणाच्या चौकशीसाठी ईडीची टीम आज मालेगावात दाखल झाली. ईडीच्या पथकाने गुजरातमधील नाशिक, सूरत, अहमदाबाद, मालेगाव आणि मुंबईतील २३ ठिकाणी छापे टाकले. किरीट सोमय्या म्हणाले होते की, मालेगाव येथील नामको बँकेच्या शाखेतून १२५ कोटी रुपयांची अफरातफर झाली आहे. एका महिन्यात देशभरातील २०० बँक खात्यातून २५०० व्यवहार झाले. मालेगाव येथील सिराज अहमद आणि मोईन खान यांनी नोकरी देतो असे सांगून बारा जणांची बँक खाती उघडली. त्यात चार दिवसांत १२५ कोटी रुपये जमा केले. त्यातील ३७ खात्यातील जमा रक्कम रोखीत बदलण्यात आली आणि ही रक्कम लगेच काढण्यात आली.

# आदिवासींना सत्तेत वाटा देऊ-राहुल गांधी

पान १ वरून

वाटा देवू. शेतकऱ्यांचे आम्ही ७० हजार कोटी कर्ज माफ केले होते, परंतु यांनी ७० हजार कोटी मुंबईत केवळ अदानीला दिले.

सत्ता आली तर आम्ही जितके पैसे पंतप्रधान मोदी यांनी श्रीमंताचे माफ केले, तितके पैसे आदिवासी व दलितांचे माफ करू. महालक्ष्मी योजनेत महिलांना दरमहा ३ हजार दिले जातील. महिलांना मोफत एसटी प्रवास दिला जाईल. शेतकऱ्यांसाठी ३ लाखांपर्यंत कर्ज माफ केले जाईल. सोयाबीन, कापसाला किमान आधारभूत किंमत दिली जाईल. सरकार आल्यास गरिबाला उपचारासाठी राज्यात २५ लाखापर्यंत विमा सुरक्षा दिली जाईल. बेरोजगारांना ४ हजार रुपये महिना देऊ. अडीच लाख तरुणांना रोजगार देणार आहेत. वेदांता प्रकल्प सरकारने गुजरातला दिला, आम्ही त्या त्या राज्याचे प्रकल्प त्याच राज्यांना देऊ. आदिवासी तरुणांना बाहेर जाऊन मजूर होण्याची गरज पडू देणार नाही. आम्ही ५० टक्के आरक्षण मर्यादा हटवू.

## पूर्वोत्तर रेल्वे

### ई-निविदा (शुद्धीपत्रक)

निविदा सूचना क्रमांक एनईआर_एसअॅण्डटी_प्रोजेक्ट_गोरखपूर_०३_२०२४ दि. ११.१०.२०२४ रोजी आमंत्रित करण्यात आली होती, सुधारणांसह शुद्धीपत्रक-२ पारित करण्यात आले आहे. तपशीलवार माहिती ई-निविदा वेबसाईट www.ireps.gov.in वर पाहता येईल.

डे.सीएसटीई/प्रोजेक्ट/एनईआर/गोरखपूर

सीपीआरओ/सिग-६६

"ज्वलनशील पदार्थासह ट्रेनमध्ये यात्रा करू नका"

## NOTICE

NOTICE is hereby given that the certificate[s] for the undermentioned securities of the **ABBOTT INDIA LTD,** has/have been lost/misplacedand the undersigned has/have applied to the Company to issue duplicate Certificate(s) for the said shares.

| Name of The Company | Name of Shareholder | Kind of Securities and face value | Folio No. | No. of Securities | Share Certificate No. | Distinctive number[s] |
|---|---|---|---|---|---|---|
| ABBOTT INDIA LTD | Mr. Mohanlal Tulsidas Bhatia | Equity and Face Value Rs.10 | B01036 | 21 | 460 | 8343908 to 8343928 |
| | Mr. Mohanlal Tulsidas Bhatia | Equity and Face Value Rs. 10 | M003504 | 141 | 10345 | 22198523 to 22198663 |

Any person who has a claim in respect of the said shares should lodge such claim with the Company at its **Registered Office. ABBOTT INDIA LTD, 3-4 CORPORATE PARK, SION-TROMBAY ROAD, MUMBAI – 400 071** within one month from this date else the company will proceed to issue duplicate Certificate(s).

Date:15/11/2024

**Mr. Narendra T. Bhatia**
**Name of the Applicant**

## SBI भारतीय स्टेट बँक

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१

### सूचना

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भागाचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भागासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्स्फर एजंट मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फाइनेंसियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद, तेलंगणा – ५०० ०३२ (इमेल आयडी: **einward.ris@kfintech.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

**भारतीय स्टेट बँक**

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक पासून | प्रमाणपत्र क्रमांक पर्यंत | विभिन्न क्रमांक पासून | विभिन्न क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ००८०९०७७ | बिपिन प्रसाद<br>नीलिम सिन्हा<br>रौशन रंजन | ८९० | ६६०६८ | ६६०६९ | ७३८९२५१५०१ | ७३८९२५२३९० |
| २ | ०१५४६४२९ | दरयास पेसि जहांकिर | २५०० | १३९५१४ | १३९५१४ | ७४१६२१४७८१ | ७४१६२१७२८० |
| ३ | ०१६३३५९८ | जयश्री जयंत कुलकर्णी<br>सुनील जयंत कुलकर्णी | १००० | १४६४५७ | १४६४५७ | ७४१९८७८७४१ | ७४१९८७९७४० |
| ४ | ०२०२४९९१ | ओंकार गोस्वामी | १५०० | १६८८०२ | १६८८०२ | ७४३१२५१००१ | ७४३१२५२५०० |
| ५ | ०२०३६७७० | उपवन छाब्रा<br>आर एन छाब्रा | १००० | १६९४९८ | १६९४९८ | ७४३१६१०६११ | ७४३१६११६१० |

**वरील आकडे रु. १/– दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई — समभागांची संख्या: **६८९०** — महाव्यवस्थापक
**दिनांक:** १५.११.२०२४ — स.प्रमाणपत्रांची संख्या: **६** — (शेअर्स व बॉण्ड्स)

## सार्वजनिक सूचना

### शेअर सर्टिफिकेट हरवले

**श्री. एस. गणेश आणि सौ. श्वेता गणेश** यांच्या संयुक्त नावे असलेले मूळ **शेअर सर्टिफिकेट क्र. 082** (प्रत्येकी 50/- रुपयांचे 5 शेअर्स, विशिष्ट क्रमांक 406 ते 410) **फ्लॅट क्र. सी-702, भगीरथ सीएचएस लि., दहिसर (पूर्व),** हरवले आहे.

हरवल्या संदर्भात दहिसर पोलीस स्टेशनमध्ये **क्रमांक 2806/2 दिनांक 12.11.2024** अन्वये पोलीस एफआयआर नोंदवण्यात आला आहे.

कोणास काही आढळल्यास, कृपया 15 दिवसांच्या आत श्री. एस. संथानम यांच्याशी + 91 99207 06728 या मोबाईल क्रमांका वर संपर्क साधा. कोणतेही दावे न केल्यास डुप्लिकेट प्रमाणपत्र दिले जाईल.

**तारीख : 15 नोव्हेंबर 2024**
**ठिकाण : मुंबई**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, जसानी रियल्टी प्रायव्हेट लिमिटेड द्वारा यांचा प्रस्तावित प्रस्तावित निवासी व व्यावसायिक झोपडपट्टी पुनर्वसन योजना हनुमान नगर शुभ शांती सी.एच.एस.एल., प्लॉट बेअरिंग सीटीएस क्रमांक D/1105 (pt) आणि D/1079 A (pt), गाव वांद्रे, तालुका- अंधेरी, खार दांडा, खार (प), वांद्रे, मुंबई, एच/डब्ल्यू – ४०००५२ येथे बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पास पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून पर्यावरणविषयक परवानगी मिळाली असून पत्रक्रमांक EC Identification No. EC24C3801MH5502605N आणि EC file SIA/MH/INFRA2/470165/2024 परिवेश वेबसाइटवर दिनांक १२.११.२०२४ ला अपलोड झाले आहे. सदर पर्यावरणविषयक परवानगी महाराष्ट्र शासन यांचा https://parivesh.nic.in/ या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

सही,
जसानी रियल्टी प्रायव्हेट लिमिटेड

## केआयएफएस हौसिंग फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** ६वा मजला, केआयएफएस कॉर्पोरेट हाऊस, हॉटेल प्लॅनेट लँडमार्कच्या बाजूला, अशोक वाटिका बीआरटीएस जवळ, इस्कॉन - आंबली रोड, आंबली, अहमदाबाद, गुजरात - ३८००५४. **कॉर्पोरेट कार्यालय :** सी-९०२, लोटस पार्क, ग्रॅहम फर्थ कंपाउंड, पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३, महाराष्ट्र, भारत, **दूर.क्र.:** +९१ २२ ६१७९६४००. **ई-मेल:** contact@kifshousing.com, **वेबसाइट:** www.kifshousing.com
**सीआयएन :** यू६५९२२जीजे२०१५पीएलसी०८५०७९. **आरबीआय सीओआर :** डीओआर-००१४५

### सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (सरफायसी कायदा) च्या कलम १३ (२) अन्वये सूचना

केआयएफएस हौसिंग फायनान्स लिमिटेड द्वारे खाली नमूद केलेल्या कर्जदारांनी/जामीनदारांनी घेतलेल्या कर्जाच्या संदर्भात, जे खाली नमूद केलेल्या तारखांना खाली नमूद केलेल्या थकबाकीसह एनपीए झाले आहेत. आम्ही आधीच सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत नोंदणीकृत पोस्ट/स्पीड पोस्ट/कुरियर द्वारे खाली नमूद केल्यानुसार तपशीलवार डिमांड नोटीस जारी केली आहे जी तुम्हाला प्राप्त न झालेले वितरीत / पोचपावती परत केली आहे. आम्ही कायद्याच्या कलम १३(४) नुसार तुमच्यापैकी एकाच्या मालकीच्या सिक्युरिटीजचा ताबा घेण्याचा आमचा हेतू आम्ही सूचित केला आहे, जर तुम्ही ६० दिवसांच्या आत खाली नमूद केलेली रक्कम भरण्यात अयशस्वी झाल्यास. वर नमूद केल्यानुसार तुम्ही दायित्व पूर्ण न केल्यास बँक/ प्रतिभूत कर्जदार सरफायसी कायद्याच्या कलम १३(४) द्वारे प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करू शकतात आणि ताबा नोटीस लिलाव सूचना प्रकाशित करताना, इलेक्ट्रॉनिक किंवा अन्यथा, अंतर्गत आवश्यकतेनुसार सरफायसी कायदा, बँक/प्रतिभूत कर्जदार देखील तुमचे छायाचित्र प्रकाशित करू शकतात. तपशील खाली दिलेले आहे:-

| अ. क्र. | शाखा/ अर्ज क्र./ एलआरएन | कर्जदार/सहकर्जदार/जामीनदाराचे नाव आणि एनपीए ची तारीख | मागणी सूचना दिनांक थकबाकी रक्कम | प्रतिभूत मालमत्तेचे तपशिलः- |
|---|---|---|---|---|
| १. | पनवेल/१०५८१५१ /एलएनएचएलपीएन व्ही/००७७७७ | **श्री. नुसरत राशीद बैग** (अर्जदार) **श्रीमती राशिदअहमद हाशिम बैग** (सह-अर्जदार) **एनपीए : १० मे, २०२४** | **मागणी सूचना दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४** **थकबाकी रू.१६६३४३४/-** | फ्लॅट क्र.००२, तळमजला, ए-विंग, जीआर रेसिडेन्सी, घर क्र. २५, घर क्र. २०४/ए, २०४/बी आणि घर क्र. २१३, भारत पेट्रोल पंपाजवळ, गाव - बापगाव भिवंडी ठाणे महाराष्ट्र भारत - ४२१३०५. **विक्री करारानुसार: पूर्व:** श्री.गुरुनाथ पाटील घर आणि रस्ता, **पश्चिम:** खुली जागा श्री. अबीदिन बर्डी आणि घर श्री.एकबाल बर्डी, **उत्तर:** रस्ता, दक्षिण: श्री. अबीदिन बर्डी आणि रोडची खुली जागा, **साइटनुसार: पूर्व१:** सीमांत जागा, **पश्चिम१:** फ्लॅट क्र.०१, **उत्तर१:** सीमांत जागा, **दक्षिण१:** पॅसेज |
| २. | विरार/ १५५६७/ एलएनएचएलव्ही आयआर०१२६५५ | **श्री. संदिप जंगबहादूर यादव** (अर्जदार) **श्रीमती उर्मिला यादव** (सह-अर्जदार) **एनपीए : १० मे, २०२४** | **मागणी सूचना दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४** **थकबाकी रू.१५१०६५५/-** | फ्लॅट क्र.१०१, पहिला मजला, आय-विंग, रिलायबल टाउनशिप कोहौसोलि, एस.क्र.१७८, १७९, मदर ब्लेस इंग्लिश स्कूल जवळ, गाव - राजावली, वसई, ठाणे महाराष्ट्र भारत - ४०१२०८. **विक्री करारानुसार: पूर्व:** जिना केस **पश्चिम :** फ्लॅट क्र.१०२, **उत्तर :** पॅसेज, विंग जी, **दक्षिण: साइटनुसार: पूर्व१:** जिना, **पश्चिम१:** फ्लॅट क्र.१०२, **उत्तर१:** पॅसेज, **दक्षिण१:** विंग जी. |
| ३. | विरार/१५७६७/ एलएनएचईव्हीआय आर०१२७१९ | **श्री. संदिप जंगबहादूर यादव** (अर्जदार) **श्रीमती उर्मिला यादव** (सह-अर्जदार) **एनपीए : १० मे, २०२४** | **मागणी सूचना दिनांक ०४ नोव्हेंबर २०२४** **थकबाकी रू.६५५०९६/-** | फ्लॅट क्र.१०१, पहिला मजला, आय-विंग, रिलायबल टाउनशिप कोहौसोलि, एस.क्र.१७८, १७९, मदर ब्लेस इंग्लिश स्कूल जवळ, गाव - राजावली, वसई, ठाणे महाराष्ट्र भारत - ४०१२०८. **विक्री करारानुसार: पूर्व:** जिना केस **पश्चिम :** फ्लॅट क्र.१०२, **उत्तर :** पॅसेज, विंग जी, **दक्षिण: साइटनुसार: पूर्व१:** जिना, **पश्चिम१:** फ्लॅट क्र.१०२, **उत्तर१:** पॅसेज, **दक्षिण१:** विंग जी. |

वर नमूद केलेल्या कर्जदारांना/जामीनदारांना सूचित केले जाते (१) अधिक आणि संपूर्ण तपशिलांसाठी खाली स्वाक्षरी केलेल्यांकडून मूळ सूचना गोळा करणे आणि २) सरफायसी कायद्यांतर्गत पुढील कारवाई टाळण्यासाठी वर नमूद केलेल्या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत थकबाकीची रक्कम व्याज आणि खर्च इ. अदा करणे.

**दिनांक: १५.११.२०२४**
**ठिकाण: महाराष्ट्र**

**सही/- प्राधिकृत अधिकारी**
**केआयएफएस हौसिंग फायनान्स लिमिटेड**

## उरवी डिफेन्स अॅण्ड टेक्नोलॉजी लिमिटेड

### (पूर्वीची उरवी टी अॅण्ड वेज लॅम्प्स लिमिटेड)

सीआयएन: **LL84220MH2004PLC145760**
पत्ता: दुकान क्र. ३२१, ऑल्वियर, निर्मल गॅलेक्सी, ला.ब.शा. मार्ग, मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०००८० भारत.
दूर. क्र.: +९१ २२ २५६५१३५५, ईमेल: info@uravilamps.com, वेबसाईट: www.uravilamps.com

**सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि सहामाहीकरिता अ-लेखापरिक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षाचा सारांश**

(₹ लाखात प्रति भाग उत्पन्न वगळता)

| अ. क्र. | तपशील | स्वतंत्र: सप्टें २०२४ रोजी संपलेले त्रैमासिक | स्वतंत्र: सप्टें २०२४ रोजी संपलेली सहामाही | स्वतंत्र: सप्टें २०२३ रोजी संपलेले त्रैमासिक | एकत्रित: सप्टें २०२४ रोजी संपलेले त्रैमासिक | एकत्रित: सप्टें २०२४ रोजी संपलेली सहामाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण उत्पन्न | १,११९.०४ | २,२४८.६९ | १,०८१.५५ | १,११९.०४ | २,२४८.६९ |
| २ | कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा विशेष बाबींपूर्व#) | ४४.९२ | १०९.७८ | ७९.८७ | ४४.९२ | १०९.७८ |
| ३ | कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष बाबींपश्चात#) | ४४.९२ | १०९.७८ | ७९.८७ | ४४.९२ | १०९.७८ |
| ४ | कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा विशेष बाबींपश्चात#) (एकत्रित आकडे असल्यास, रकमेमध्ये सहयोगी कंपनीकडून नफ्यामधील हिस्सा समाविष्ट) | ३०.४९ | ७५.१० | ५७.५३ | ३४.५५ | ७९.१६ |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (नफा/(तोटा) समाविष्ट) (करपश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) | ३२.१० | ७५.३६ | ५४.६१ | ३६.१६ | ७९.४२ |
| ६ | इक्विटी समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹१०/- प्रति भाग) | १,१०० | १,१०० | १,१०० | १,१०० | १,१०० |
| ७ | राखीव (पूनर्मुल्यांकित राखीव वगळता) | | | | | |
| ८ | प्रतिभाग उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी) (अखंडीत आणि खंडीत प्रचलनाकरिता) | | | | | |
| | १. मूळ | ०.२८ | ०.६८ | ०.५२ | ०.३१ | ०.७२ |
| | २. सौम्यीकृत | ०.२६ | ०.६७ | ०.५२ | ०.३० | ०.७१ |

टीपा:

१. वरील विवरणपत्र सेबी (सूचिबद्धता आणि इतर प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या वित्तीय निष्कर्षाच्या तपशीलवार प्रारुपाचा सारांश आहे. त्रैमासिक/वार्षिक वित्तीय निष्कर्षाचे संपूर्ण प्रारुप स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईट्स म्हणजेच **https://www.bseindia.com** आणि **https://www.nseindia.com** वर आणि कंपनीची वेबसाईट **www.uravilamps.com** उपलब्ध आहे.
२. दि. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि सहामाहीकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष लेखा समितीद्वारे पुनरावलोकित करण्यात आले आहेत आणि संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. १३ नोव्हेंबर, २०२४ रोजी घेण्यात आलेल्या सभेमध्ये मंजूर करण्यात आले आहेत.
३. वित्तीय निष्कर्ष कंपन्यांचे (भारतीय लेखा मानके)(सुधारणा) नियमन, २०१८ सह वाचावयाच्या कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अन्वये विहीत केल्यानुसार भारतीय लेखा मानके (आयएनडी एएस)च्या अनुपालनात बनविण्यात आले आहेत.
४. दि. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निष्कर्ष कंपनीच्या वैधानिक लेखापरिक्षकांद्वारे मर्यादित पुनरावलोकनाच्या अधीन आहेत.

उरवी डिफेन्स अॅण्ड टेक्नोलॉजी लिमिटेडकरिता आणि त्यांच्या वतीने
(पूर्वीची उरवी टी अॅण्ड वेज लॅम्प्स लिमिटेड)
सही/-
श्री. निरज गढा
व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ
डीआयएनः ००५१५९३२

दिनांक: १३.११.२०२४
ठिकाण: मुंबई

रामेश्वर मीडिया

# नवाकाळ

• पुणे । शुक्रवार १५ नोव्हेंबर, २०२४ • पान - ६

## थोडक्यात...

### राहुल गांधींची सोयाबीनच्या दरावरून भाजपावर टीका

**मुंबई** - राज्यातील शेतकऱ्यांना भाजपा सरकारमुळे सोयाबीन हमीभावापेक्षा कमी दराने विकावे लागत आहे. सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळे शेतकरी हताश आणि निराश झाल्याची टीका लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. एक्स पोस्ट करत राहुल गांधी म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकरी मला सांगत होते की, सोयाबीन उत्पादनाचा खर्च प्रति क्विंटल ४ हजार रुपये इतका आहे. तर सोयाबीनच्या विक्रीची किंमत ३ हजार रुपये प्रति क्विंटल इतकी आहे. त्यामुळे आमचे १ हजार प्रति क्विंटल इतके नुकसान होते. या भाजपा सरकारने शेतकऱ्यांना सोयाबीन उत्पादन कमी किमतीत विकायला भाग पाडले.

### गौतम अदानींची अमेरिकेत १० अब्ज डॉलरची गुंतवणूक

**नवी दिल्ली** - आशियातील दुसरे सर्वात श्रीमंत उद्योगपती गौतम अदानी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना विजयानंतर मोठी भेट दिली आहे. निवडणुकीतील विजयाबद्दल डोनाल्ड ट्रम्प यांचे अभिनंदन करताना अदानी यांनी येत्या काही दिवसांत अमेरिकेत १० अब्ज डॉलर म्हणजेच ८४ हजार कोटी रुपयांहून अधिकची गुंतवणूक करणार असल्याची घोषणा केली आहे. गौतम अदानी यांनी बुधवारी अमेरिकेत ऊर्जा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात १० अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याची घोषणा केली. या माध्यमातून १५ हजार नोकऱ्या निर्माण करण्याचे आमचे लक्ष्य असल्याचेही अदानी यांनी आपल्या पोस्टमध्ये सांगितले.

### प्रियांका गांधी यांची गडचिरोलीत प्रचारसभा

**मुंबई** - काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी-वढ्रा गडचिरोलीत प्रचारसभा घेणार आहेत. आरमोरी विधानसभेचे काँग्रेस उमेदवार रामदास मेश्राम यांच्यासाठी १७ नोव्हेंबरला त्या सभा घेतील. मेश्राम यांच्या समोर भाजपा उमेदवार कृष्णा गजबे यांचे आव्हान आहे.

### डोंबिवलीतील भाजपा कार्यालयाची तोडफोड

**डोंबिवली** - विधानसभा निवडणुकीमुळे राज्यातील राजकारण तापले असताना आज डोंबिवली पश्चिमेतील गुजराती सेलचे पदाधिकारी जुगल उपाध्याय यांच्या कार्यालयाची ३ ते ४ अज्ञात व्यक्तींनी शिवीगाळ करून तोडफोड केली. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. उपाध्याय यांच्या कार्यालयात काही अज्ञात व्यक्तींनी येऊन शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आमच्या जातीबद्दल सोशल मीडियावर पोस्ट का करतो, असा जाब विचारत व्यक्तींनी उपाध्याय यांच्या कार्यालयाची तोडफोड केली.

### चेंबूरमध्ये गॅस गळती घराला आग! एक जखमी

**मुंबई** - चेंबूरच्या वाशी नाका परिसरातील म्हाडा कॉलनीतील इमारत क्रमांक ६ मधील नाफिर सय्यद (६०) यांच्या घरात काल रात्री ११ वाजता गॅस सिलिंडरमधून गळती होऊन आग लागली. आगीमुळे घरातील साहित्याचे नुकसान झाले. स्थानिक रहिवाशांनी आगीची माहिती अग्निशमन दलाला दिली. त्यानंतर अग्निशमन दलाच्या दोन गाड्या आणि आरसीएफ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी काही वेळातच या आगीवर नियंत्रण मिळवले. या घरात अडकलेल्या नाफिर सय्यद यांना जवानांनी बाहेर काढून त्यांना शीव रुग्णालयात दाखल केले. नाफिर सय्यद ३० टक्के भाजले आहेत.


**पश्चिम रेल्वे**

**दुरुस्ती काम**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यू), पश्चिम रेल्वे, ६ वा मजला, अभि. विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८ आमंत्रित करीत आहेत **निविदा सूचना क्र.: बीसीटी/२४-२५/२०५ दिनांक: १२.११.२०२४. काम आणि ठिकाण : विरार-जोरावसन अनुभाग-सि. डीईएन/उत्तर/एमएमसीटीच्या कार्यक्षेत्राअंतर्गत जुन्या जीर्ण आरसीसी स्टोरेज टँकऐवजी ३ आरसीसी ओएच टँक पुरविणे. कामाचे अंदाजित मूल्य: ₹ ४,२१,४५,१८९.३६/-. ईएमडी: ₹ ३६०७००/-. सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: दि. ०६.१२.२०२४ रोजी, १५.०० वाजेपर्यंत. उघडण्याचा दिनांक आणि वेळ:** दि. ०६.१२.२०२४ रोजी १५.३० वा. अधिक तपशिलाकरिता कृपया आमची वेबसाईट **www.ireps.gov.in** येथे भेट द्यावी. 0734

आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly


## मनसेचा जाहीरनामा आज प्रसिद्ध होणार



**मुंबई** - महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचा विधानसभा निवडणुकीसाठीचा जाहीरनामा उद्या प्रसिद्ध होणार आहे. वांद्रे येथील एमआयजी क्लब येथे जाहीरनामा प्रसिद्धीचा कार्यक्रम पार पडेल. यावेळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जवळपास सर्वच पक्षांनी आपापल्या जाहीरनाम्यातून महाराष्ट्रातील जनतेवर आश्वासनांचा वर्षाव केल्यानंतर मतदानाला पाच दिवस उरले असताना मनसेचा जाहीरनामा प्रकाशित होत आहे. दरम्यान, आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे बीड दौऱ्यावर होते. परंतु हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे राज ठाकरे यांचा आजचा दौरा रद्द झाला आहे.

## उद्धव, आदित्यची बॅग तपासली खरगे, गडकरींचीही सामान झडती

**आयोगाच्या भरारी पथकाची कारवाई सुरूच**

■ नागपूर

**विधानसभा** निवडणुकीच्या प्रचारासाठी राज्यात राजकीय नेत्यांची धावपळ सुरू असताना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सामानाची श्रीगोंदा येथे तिसऱ्यांदा तपासणी झाली. त्यासोबत दापोलीत आदित्य ठाकरे, नाशिकमध्ये काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, गोंदियामध्ये नाना पटोले, कराडमध्ये गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, मंगळवेढ्यात भाजपाचे नेते नितीन गडकरी, भाजपाच्या नेत्या पंकजा मुंडे यांच्या बॅगांची तपासणी निवडणूक आयोगाच्या भरारी पथकांकडून तपासणी करण्यात आली.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे तिरोडा गोरेगाव मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार रविकांत बोपचे याच्या प्रचारासाठी मुंडींकोटा येथे सभेसाठी जाण्यासाठी तिरोडा येथील हेलिपॅडवर आले. यावेळी निवडणूक आयोगाच्या पथकाकडून सलग दुसऱ्या दिवशी त्यांच्या बॅगेची तपासणी केली. नितीन गडकरी मंगळवेढा येथील हेलिपॅडवर येताच निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या बॅगांची तपासणी केली. प्रमोद सावंत महायुतीचे कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील उमेदवार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या प्रचारासाठी आले होते. ते कराड विमानतळावर उतरताच त्यांची बॅग भरारी पथकाने तपासली.



आदित्य ठाकरेंचीही बॅग तपासली

## सातार्‍यात शरद पवारांच्या दोन दिवसांत पाच सभा

■ सातारा

**राष्ट्रवादी** काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे सातारा हा बालेकिल्ला राखण्यासाठी दोन दिवसांत पाच सभा घेणार आहेत. ते एक दिवस सातार्‍यात मुक्कामही करणार आहेत. विधानसभा निवडणुकीचा प्रचार सुरू झाल्यापासून शरद पवार सातार्‍यात आलेले नाहीत. त्यांनी शेवटच्या टप्प्यातच त्यांनी सातार्‍यात प्रचार करण्याचे ठरविले आहे.

निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात त्यांच्या सभांचे नियोजन करण्यात आले आहे. यातून बालेकिल्ला पुन्हा राखण्यासाठीच त्यांची ही रणनीती असल्याचा अंदाज आहे. यासाठी ते १५ नोव्हेंबरला सातारा मुक्कामी आहेत. यादिवशी त्यांची कराड उत्तर मतदारसंघात रहिमतपूरला सभा होईल. तसेच १६ नोव्हेंबरलाही ते वाई, कोरेगाव, दहिवडी आणि फलटण येथे चार सभा घेणार आहेत.

## साध्वी प्रज्ञासिंह यांच्याविरूद्ध दुसरे जामीनपात्र वॉरंट जारी

**मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण**

■ मुंबई

**२००८ च्या** मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणीच्या खटल्यात सुनावणीला वारंवार गैरहजर राहणाऱ्या आरोपी प्रज्ञा सिंह राठोड यांच्या विरूद्ध विशेष एनआयए न्यायालयाने काल दुसऱ्यांदा जामीनपात्र वॉरंट जारी केले. या प्रकरणी गेल्या आठवड्यात झालेल्या सुनावणीदरम्यान प्रज्ञा सिंह ठाकूर यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, प्रज्ञा सिंह गंभीर आजारी असून, त्या भोपाळमधील एका खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यामुळे त्या सुनावणीसाठी व्यक्तीशः न्यायालयात हजर राहू शकत नाही. त्यांची प्रकृती पूर्णपणे ठीक होईपर्यंत त्यांना सुनावणीदरम्यान गैरहजर राहण्याची मुभा द्यावी.



मात्र न्यायालयाने त्यांची मागणी फेटाळून लावताना त्यांच्याविरूद्ध जामीनपात्र वॉरंट जारी केले होते. त्यानंतर कालच्या सुनावणीसाठीही प्रज्ञा सिंह ठाकूर हजर न राहिल्याने त्यांच्या विरूद्ध न्यायालयाने दुसऱ्यांदा वॉरंट जारी केले. दरम्यान, प्रज्ञा सिंह ठाकूर यांनी आपला एक फोटो काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर शेअर केला होता. त्या फोटोमध्ये त्यांचा चेहरा सुजल्याचे दिसत आहे.

## मलिक यांचा जामीन रद्द करण्याच्या याचिकेवर तातडीने सुनावणीस नकार

■ मुंबई

**मानखुर्द-शिवाजीनगर** विधानसभा मतदारसंघातून अजित पवार गटाकडून निवडणूक लढवणारे आमदार नवाब मलिक यांना आज दिलासा मिळाला. त्यांचा जामीन रद्द करण्याच्या याचिकेवर मुंबई हायकोर्टाने तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला. या याचिकेवरील पुढील सुनावणी निवडणुकीनंतर ९डिसेंबरला होणार असून, याचिकाकर्त्यांना पुरावा सादर करण्यासाठी हायकोर्टाने २ आठवड्यांचा वेळ दिला.

आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी सुप्रीम कोर्टाने मलिकांना जानेवारीत तीन महिन्यांचा वैद्यकीय जामीन मंजूर केला होता. त्यानंतर त्यांच्या जामिनात वाढ केली. निवडणूक लढवण्यासह प्रचारात त्यांचा सक्रिय सहभाग असल्यामुळे त्यांच्याविरोधात याचिकाकर्ते सॅमसन पाथरे यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली. या याचिकेत ते म्हणाले की, मलिक यांना सर्वोच्च न्यायालयाने प्रकृतीच्या कारणाने जामीन मंजूर केला. मात्र मलिक याचा गैरफायदा घेत निवडणूक प्रचारात दंग आहेत. त्यामुळे त्यांचा नियमित जामीन रद्द करावा. मात्र कोर्टाने तत्काळ सुनावणी घेण्यास नकार दिला.

## संतोष बांगरांवर मतदारांना पैसे वाटपाचा गुन्हा दाखल

■ हिंगोली

**कळमनुरी** विधानसभेचे शिंदे गटाचे उमेदवार आमदार संतोष बांगर यांच्यावर पैसे वाटपाचा आरोप ठाकरे गटाने केल्यावर काल रात्री उशिरा कळमनुरी पोलीस ठाण्यात त्यांच्यावर निवडणूक आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला. कळमनुरीत वाकोडी परिसरात काल सायंकाळी शिंदे गट व ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला होता. यावेळी २ वाहनांची तोडफोड आणि ठाकरे गटाच्या एका कार्यकर्त्याला मारहाण झाली. प्रचारासाठी वाकोडी येथे आलेले संतोष बांगर आणि त्यांचे कार्यकर्ते त्या ठिकाणी मतदारांना पैसे वाटत असल्याचा आरोपही ठाकरे गटाने केला. या प्रकरणात प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे म्हणत ठाकरे गटाचे उमेदवार डॉ. संतोष टारफे यांच्यासह ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी काल रात्री पोलीस ठाण्यासमोर ठाण मांडले होते.

## अपक्ष उमेदवारांना गद्दारच समजणार उद्धव ठाकरेंचा बंडखोरांवर घणाघात

■ अहमदनगर

**अपक्ष** उमेदवार आहेत ते गद्दारीच करत असतात. ती बंडखोरी नाही तर गद्दारीच असते. त्यामुळे अपक्ष उमेदवारांना गद्दारच समजणार, असा घणाघात ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. उद्धव ठाकरे यांची आज श्रीगोंदा येथे सभा पार पडली, यावेळी त्यांनी बंडखोरांवर आणि महायुती सरकारवर जोरदार निशाणा साधला.

उद्धव ठाकरे म्हणाले की, जनतेला आता आपले कोण व आपल्यात घुसलेले शकुनीमामा कोण, हे कळेल. या शकुनीमामांची काही



अपशकुनी मांजरे बंडखोरी करून आपली मते फोडण्याचा प्रयत्न करत आहेत, हे तुम्हाला मान्य आहे का? त्यामुळे महाविकास आघाडीच्या येथील सर्वच नेत्यांनी विशेषतः खासदार नीलेश लंके यांनी येथे येऊन आमच्या उमेदवाराचा प्रचार केला पाहिजे. जे अपक्ष उमेदवार आहेत ते गद्दारीच करतात. काहीजण बंडखोरी करत आहेत. ती बंडखोरी नाही तर गद्दारीच आहे. आज आपण स्वाभिमानाने आपला महाराष्ट्र उभा करण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यात हे बंडखोर गद्दार अपशकुन करत आहेत. कुठे फेडाल हे पाप? आपली मते फुटून दुसरेच कुणीतरी निवडून आले तर जनतेच्या आयुष्याला मोठे भगदाड पडणार आहे.

## नागपुरातील सेंट्रल अ‍ॅव्हेन्यूमध्ये १ कोटी ३५ लाखांची रोकड जप्त

■ नागपूर

**विधानसभा** निवडणुकीत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी पोलिसांकडून नाकाबंदीवर वाहनांची काटेकोरपणे तपासणी सुरू आहे. या नाकाबंदीत काल रात्री मध्य नागपुरातील सेंट्रल एव्हेन्यू परिसरात पोलिसांनी १ कोटी ३५ लाख रुपये घेऊन जाणाऱ्या दुचाकीस्वाराला ताब्यात घेतले. शाबीर खान हाजी नासिर खान (२७) असे ताब्यात घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. एक व्यक्ती दुचाकीवरून मोठी रोकड घेऊन जाणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सेंट्रल अ‍ॅव्हेन्यू परिसरात शाबीर खानला ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांना त्याच्याकडे १ कोटी ३५ लाखांची रोकड मिळाली. पोलिसांनी त्याची विचारपूस केली असता त्याने उडवाउडवीचे उत्तर दिल्यामुळे पोलिसांनी संपूर्ण रक्कम ताब्यात घेऊन निवडणूक आयोगाकडे जमा केली. ही रक्कम एका बांधकाम व्यावसायिकाकडे नेली जात असल्याचे चौकशीत उघड झाले.

## 'लॉटरी किंग' सँटियागो मार्टिनच्या देशभरातील अनेक ठिकाणांवर छापे

**२०१२ चा लॉटरी घोटाळा**

■ चेन्नई

**लॉटरीतील** आर्थिक फसवणूक आणि बेकायदेशीर लॉटरी विक्रीप्रकरणी सक्तवसुली ईडीच्या पथकांनी आज 'लॉटरी किंग' सँटियागो मार्टिन याच्या देशभरातील अनेक ठिकाणांवर छापेमारी केली. त्याच्या तामिळनाडूतील चेन्नई, कोईम्बतूरमधील २० ठिकाणांवर आणि हरियाणाचे फरिदाबाद, पंजाबमधील लुधियाना, पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील ठिकाणांवर ईडी पथकांनी छापे टाकले. सँटियागो मार्टिन आणि इतरांविरुद्ध २०१२ मध्ये नोंदवलेल्या लॉटरी घोटाळ्याच्या प्रकरणाची ईडी चौकशी



करत आहे. यापूर्वी ईडीने या प्रकरणी २७७.५९ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. त्यात तामिळनाडूतील स्थावर मालमत्तांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता. ईडीने मार्टिन आणि त्यांची कंपनी, फ्युचर गेमिंग सोल्यूशन्स (पी) लिमिटेड, फ्यूचर गेमिंग आणि हॉटेल सर्व्हिसेस (पी) लिमिटेड आणि पूर्वी मार्टिन यांच्याविरुद्ध चौकशी सुरू केली होती. लॉटरी नियमन कायद्याचे उल्लंघन करून राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने लॉटरी घोटाळा झाला. १ एप्रिल २००९ ते ३१ ऑगस्ट २०१० पर्यंत पारितोषिक विजेत्या तिकिटांचे दावे वाढवून ९१०.३० कोटी रुपयांहून अधिक बेकायदेशीर कमावल्याचा आरोप आहे.

## मोदींमुळे महाराष्ट्र मागे गेला संजय राऊत यांची बोचरी टीका

■ मुंबई

**पंतप्रधान** नरेंद्र मोदींनी मागील दहा वर्षांत देशात फार मोठी क्रांती केली असे कुठे दिसत नाही. मात्र मोदींमुळे महाराष्ट्र किमान दहा वर्षे मागे गेला हे निश्चित, अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

पंतप्रधान मोदी हे कट्टर महाराष्ट्रद्वेष्ट्ये आहेत. महाराष्ट्राचा स्वाभिमान त्यांना तोडायचा आहे. त्यांच्या महाराष्ट्र लुटण्याच्या धोरणामुळे महाराष्ट्र किमान दहा वर्षे मागे गेला आहे, असे राऊत म्हणाले.

मोदींच्या राज्य आणि देशभरातील प्रचार सभांवरही राऊत यांनी टीका केली. मोदी ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंतच्या

निवडणुकांच्या प्रचारात कायम व्यस्त असतात. प्रचार सभांमधून लोकांना खोटी स्वप्ने दाखवतात. वाट्टेल त्या थापा मारतात. जेव्हा देशात कुठलीही निवडणूक नसते तेव्हा ते परदेशात फिरायला जातात, अशी बोचरी टीका राऊत यांनी केली.

## शरद पवार गट-भाजपात नाशिकमध्ये राडा

■ नाशिक

**नाशिकमध्ये** भाजपा आणि शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाला. या प्रकरणानंतर शरदचंद्र पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सभा रद्द करून थेट पोलीस आयुक्तालय गाठले. नाशिक पूर्व मतदारसंघात आज भारतीय जनता पक्षाचे उमेदवार राहुल ढिकले यांच्या प्रचारार्थ रॅली सुरू होती. त्यावेळी पंचवटी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शरद पवार गटाचे उमेदवार गणेश गीते यांच्या भावाच्या गाडीतून पैसे वाटप केले जात असल्याचे त्यांना कळले. त्यानंतर राहुल ढिकले यांचे कार्यकर्ते तेथे पोहोचले. यानंतर दोन्ही उमेदवारांचे कार्यकर्ते आमनेसामने आले.

## महिला आयोगात 'शो पीस' बाहुली सुषमा अंधारे यांची चाकणकरांवर टीका

■ मुंबई

**महिला** आयोगात 'शो पीस' ची बाहुली आहे, असे टीकास्त्र ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी अजित पवार गटाच्या नेत्या व राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचे नाव न घेता यांच्यावर डागले. तसेच त्यांनी यावेळी शिंदे गट आणि राज ठाकरेंवरदेखील निशाणा साधला. पाचोरा येथे महाविकास आघाडीच्या वैशाली सुर्यवंशी यांच्या प्रचारार्थ सुषमा अंधारे उपस्थित होत्या.

सुषमा अंधारे म्हणाल्या



की, महिला आयोगात शो पीस बाहुल्या आहेत. शो पीस बाहुल्या म्हणून काम करणाऱ्या, सोयीस्करवादाच्या धनी असलेल्या या महिलांच्या प्रश्नांवर चकार शब्द काढत नाहीत. नुसते टुकू टुकू अशाने प्रश्न सुटत नाही. उगाच अंगावर महागडी साडी नेसून स्वदेशी अंबाड्यात मेड इन अमेरिकेच्या प्लास्टिक फुलांचा गजरा माळून, केसात इंग्लंडचे बक्कल, टांझानियाची टिकली अन् नायझेरियाची लिपस्टिक चिकटवून, ब्राझीलवरून आणलेल्या उंच- उंच चपला पायात घालून महिलामुक्तीवर बोलतात.

## फ्लिपकार्टच्या जाहिरातीवर आक्षेप संचालकांच्या अटकेची मागणी

■ मुंबई

**देशातील** सर्वात मोठा ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म असलेल्या सेक्स बायबल फॉर वुमन या मथळ्याखाली नुकत्याच प्रकाशित केलेल्या जाहिरातीला वॉचडॉग फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेने तीव्र आक्षेप घेतला असून, या कृत्याबद्दल फ्लिपकार्टच्या संचालकांना अटक करण्याची मागणी मुंबई पोलिसांकडे लेखी पत्राद्वारे केली आहे. या जाहिरातीमुळे ख्रिश्चनांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत. अशाप्रकारे कोणाच्याही धार्मिक भावना दुखावण्याचा अधिकार कोणालाही नाही. त्यामुळे फ्लिपकार्टवर भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांद्वारे कारवाई करावी आणि भविष्यात असे प्रकार होऊ नयेत याची खबरदारी घ्यावी, अशी विनंती वॉचडॉग फाऊंडेशनने केली आहे.

## शेअर बाजारात सलग सहाव्या दिवशी घसरण

■ मुंबई

**देशांतर्गत** शेअर बाजारात आज सलग सहाव्या दिवशी घसरण झाली. दिवसभरातील अस्थिरतेअंती दोन्ही प्रमुख निर्देशांक घसरणीसह बंद झाले. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ११० अंकांनी घसरून ७७,५८० अंकांवर तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी २६ अंकांच्या घसरणीसह २३,५३२ अंकांवर बंद झाला. बँक निफ्टीत मात्र वाढ झाली. बँक निफ्टी ९१ अंकांनी वाढून ५०,१७९ अंकांवर बंद झाला. आजच्या घसरणीत सेन्सेक्समधील ३० पैकी १७ कंपन्यांचे शेअर घसरले तर उर्वरित १३ कंपन्यांचे शेअर वाढीसह बंद झाले.

## भाजपामुळे महागाईचा आगडोंब मराठी माणसाकडून ९० हजारांची लूट

**पवन खेरा यांचा हल्लाबोल**

■ मुंबई

**भारतीय** जनता पक्षाच्या सरकारमुळे महागाईचा आगडोंब उसळला असून, खाद्यतेलासह, किराणा मालाचे भाव प्रचंड वाढले आहेत. लसूण ५०० रुपये किलो तर कांदा १०० रुपये किलो झाला आहे. जीवनावश्यक वस्तुंच्या वाढत्या किमतीमुळे सर्वसामान्य तसेच मध्यमवर्गीय कुटुंबाचे किचनचे बजेट कोलमडले आहे. या महागाईतून मोदी सरकार प्रत्येक मराठी कुटुंबाच्या खिशातून वर्षाला ९० हजार रुपये लुटत आहे आणि जनतेच्या या मुळ मुद्द्यांपासून लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी 'बटेंगे, कटेंगे, व्होट जिहाद' सारखी



नारेबाजी केली जात असल्याचा हल्लाबोल अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया व पब्लिसिटी विभागाचे चेअरमन पवन खेरा यांनी केला आहे.

टिळक भवनमध्ये पत्रकार परिषदेला संबोधित करताना पवन खेरा यांनी भाजपा सरकारच्या कारभाराचा पंचनामा केला. ते पुढे म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून भाजपाचा गल्लीतील नेतेही जगातील सर्व मुद्द्यांवर प्रवचन देतात, पण जनतेला भेडसावत असलेल्या मुद्द्यांवर एक शब्दही बोलत नाहीत, हीच भाजपाच्या प्रचाराची दिशा आहे. झारखंडमधील प्रचारात पंतप्रधान मोदींनी घुसखोरी झाल्याचे सांगितले, पण देशात तर ११ वर्षांपासून मोदींचेच सरकार आहे मग ही घुसखोरी झालीच कशी?

## बाबा सिद्दिकींवर गोळी झाडल्यानंतर आरोपी रुग्णालयात ३० मिनिटे थांबला

■ मुंबई

**अजित** पवार गटाचे नेते बाबा सिद्दिकींवर गोळी झाडल्यानंतर आरोपी रुग्णालयात जवळपास ३० मिनिटे थांबला होता. बाबा सिद्दिकी यांच्यावर गोळीबार करणारा आरोपी शिवकुमार गौतम याने पोलीस चौकशीदरम्यान हा मोठा खुलासा केला आहे. सिद्दिकींना गोळी मारल्यानंतर, आरोपी शिवकुमार गौतमने आपला शर्ट बदलला आणि गुन्ह्याच्या ठिकाणी परत आला होता आणि सुमारे २० मिनिटे घटनास्थळी सुरू असलेला गोंधळ त्याने पाहिला. त्यानंतर शिवकुमार गौतम हा बाबा सिद्दिकी यांचे निधन झाल्याची खात्री करण्यासाठी लीलावती रुग्णालयात गेला होता. जवळपास ३० मिनिटे शिवकुमार गौतम लीलावती रुग्णालयात होता. बाबा सिद्दिकी यांची तब्बेत अत्यंत चिंताजनक असून, वाचण्याची शक्यता धूसर असल्याची खात्री पटल्यानंतरच शिवकुमार तिथून निघून गेला. त्यानंतर रिक्षाने तो कुर्ल्याला गेला, तिथून ठाण्याला लोकलने गेला. ठाण्यावरून एक्स्प्रेसने पुण्याला रवाना झाला.

शिवकुमार गौतम याने नियोजनानुसारच हल्ला केला. दुसरे आरोपी धर्मराज कश्यप आणि गुरमेल सिंह हे उज्जैन रेल्वे स्थानकावर भेटणार होते. जिथे बिश्नोई गँगचा एक सदस्य त्यांना वैष्णोदेवीला घेऊन जाणार होता.


**५६ वा वाढदिवस**



दादर नायगांव विभागातील आंबेडकरी चळवळीचे निष्ठावंत कार्यकर्ते व समाजसेवक

**आयुष्यमान प्रमोद नारायण पराड**

५६ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!